विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| **मासिकाचे नाव** | **:** | **सद्धर्म : त्रैमासिक** |
| **संस्थापक** | **:** | **गुंडोपंत, हरिभक्त** |
| **संपादक** | **:** | **डॉ. विजय वा. बेडेकर** |
| **प्रकाशक** | **:** | **अनंत विनायक धोरे** |
| **प्रकाशन वर्ष** | **:** | **२०१९** |
| **वर्ष** | **:** | **चोप्पन्नावे** |
| **अंक** | **:** | **दुसरा** |
| **पृष्ठे** | **:** | **३२ पृष्ठे** |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**

**"ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१९**

**गणपत्रिका क्रमांक : २००**

Registered with the
Registrar of News-
paper for India,
under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान ७५ रुपये

दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.
भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $

# सद्धर्म
त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

वर्ष : चोप्पन्नावे अंक : दुसरा ज्येष्ठ/आषाढ १९४१ जुलै २०१९

## *संपादकीय*

### माझे जीवीची आवडी : पंढरपुरा नेईन गुढी।

**''आषाढी कार्तिकी विसरु नका मज**
**सांगतसे गुज पांडुरंग।।''**

'आषाढी कार्तिकी वारीला मला विसरु नका' असं पांडुरंग आपल्या भक्ताला सांगतो. यावरुन स्वतः पांडुरंगाला आपल्या भक्तांच्या भेटीची ओढ लागते हे अधोरेखित होते. गेली जवळजवळ दहा शतकं पंढरपुरच्या वारीने मराठी समाजमनाला भक्ती, प्रेम व ज्ञानाची वैचारिक पृष्ठभूमी दिली आहे. महाराष्ट्र, कर्नाटक व समग्र भारतवर्षात पांडुरंगाचे भक्त आढळतात. परंतु, सोशल मिडिया व टीव्हीवरील काही रिपोर्टस्च्या माध्यमातून जनसामान्यापर्यंत वारी पोचते ते एक इव्हेंट म्हणून. लोक कसे ऊनपावसात चालतात, 'पाऊले चालती पंढरीची वाट' इत्यादी उत्सवी स्वरुपाची गाणी लावून हा सोहळा 'कव्हर' करण्याचा सर्वच माध्यमांचा प्रयत्न असतो. वारीच्या मागची तात्विक बैठक समजून घेण्याचा प्रयत्न क्वचितच होताना दिसतो. तो करावा म्हणून हा लेखप्रपंच.

वारकरी संप्रदाय म्हणजे महाराष्ट्र व कर्नाटक या प्रदेशांमध्ये प्रचलित असलेला एक वैष्णव संप्रदाय आहे. वारी करणारा तो वारकरी होय. या वारी शब्दाच्या अनेक व्युत्पत्त्या अनेक विद्वानांनी दिल्या आहेत. 'वारी' हा शब्द 'फेरी' किंवा 'खेप' या अर्थाने अभिप्रेत आहे. प्रतिवर्षी अगर प्रत्येक महिन्यास नियमितपणे एखाद्या पवित्र स्थळीच्या यात्रेला वारी म्हणतात.

वारकऱ्यांच्या बाबतीत मुख्य पवित्र स्थळ म्हणजे 'पंढरपूर'. आषाढी, कार्तिकी, माघी व चैत्री या प्रमुख चार वाऱ्या आहेत. शं. वा. दांडेकर म्हणतात –

(पृष्ठ क्र. २९ वर)

## सद्धर्म त्रैमासिकासंबंधी माहिती व सूचना

१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या सद्धर्म प्रकाशनातर्फे हे त्रैमासिक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यात प्रसिद्ध केले जाते. या अंकाचे वर्षात केव्हाही सभासद होता येते. सभासद झाल्यावर त्या वर्षाचे ४ अंक पाठविले जातील.

२) ट्रस्टच्या कार्यालयाचा पत्ता : सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट, द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४००६०१. इमारतीचे बांधकाम सुरु असल्याने कार्यालय बंद आहे. कृपया टपाल व मनीऑर्डर्स पाठवू नये.

३) सभासद देणगी : वार्षिक ७५ रु., दीर्घकालीन १००० रु.(१५ वर्षाकरता) परदेशस्थ सभासदांना १२५ $ (U.S.) दीर्घकालीन योजना (१५ वर्षाकरता).५०० रुपये आजीव सभासद योजना २००९ पासून बंद करण्यात आली असून नवीन दीर्घकालीन सभासद योजना सुरु करण्यात आली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत झालेल्या सर्व आजीव सभासदांना हा अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. बऱ्याच आजीव सभासदानी वाढत चाललेल्या महागाईचा विचार करुन आम्ही केलेल्या विनंतीनुसार ऐच्छिक देणगी म्हणून ५०० रुपये ते १००० रुपये पाठविले आहेत. ज्यांनी आजपर्यंत ऐच्छिक देणगी पाठविली नाही त्यांनी ती लवकर पाठवावी अशी कळकळीची विनंती आहे.

४) देणगी, टपाल, मनीऑर्डर व धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डिमाण्ड ड्राफ्ट) कार्यकारी विश्वस्तांच्या पत्त्यावर* पाठवाव्यात. देणगी पाठविताना आपले संपूर्ण नाव (संस्था अस त्यास अध्यक्ष किंवा कार्यवाह) पूर्ण पत्ता (पिन कोडसह) सभासद क्रमांक (सभासद असल्यास) व दूरध्वनी क्रमांक (कोड नंबरसह) ही माहीती सुवाच्य अक्षरांत कळवावी.

**देणगी ट्रस्टच्या खालील बँकांतील सेव्हिंग्ज खात्यांतही भरता येईल.**

| बँक | शाखा | खाते क्र. | बँक IFSC कोड |
|---|---|---|---|
| **स्टेट बँक ऑफ इंडिया** SBI | **जे के ग्राम, ठाणे (प.)** | **10884930955** | **SBIN 0009056** |
| **ठाणे जनता सहकारी बँक** TJSB | **खोपट, ठाणे (प.)** | **009110100016689** | **TJSB 0000009** |
| **ठाणे भारत सहकारी बँक लि.** TBSB | **मुख्य शाखा,ठाणे (प.)** | **002115000024520** | **TBSB 0000002** |

वरील सर्व बँक खात्यांचे दिलेले तपशील वापरुन आपणास सद्धर्म त्रैमासिकाची देणगी पाठविण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. आता देणगी पाठविण्यासाठी भ्रमणध्वनी (Mobile Application) चा वापर करूनही ती पाठवू शकता. त्याचा निश्चित वापर करावा. त्याचा उपयोग करून आपण देणगी पाठवितांना या (Mobile Application) च्या Narration रकान्यात प्रथम देणगीदार क्रमांक, आपले पूर्ण नाव व भ्रमणध्वनी क्रमांक क्रमाने लिहिणे आवश्यक आहे. अन्यथा आपले नावावर देणगी जमा करणे कठीण पडते. हे लक्षात घ्यावे, व सहकार्य करावे. ही विनंती.

भारतीय स्टेट बँक त्यांच्या इतर शाखांतून आलेली रोख रक्कम (चेक नव्हे) ग्राहकांच्या खात्यांत जमा करण्याकरता २५ रुपये सेवा शुल्क आकारते. तेव्हा त्या बँकेत देणगी रोख रकमेत पाठविताना २५ रुपये अधिक पाठवावे.

वरील बँकांमार्फत देणगी पाठविल्यास पोस्टकार्डाने किंवा दूरध्वनी वरुन ट्रस्टच्या कार्यालयात किंवा श्री. प्रकाश भास्कर दीक्षित (कार्यकारी विश्वस्त) यांना कळवावे. यामुळे देणगीची नोंद घेणे सोयीचे होईल. (पत्ता पुढे दिला आहे.)

५) सद्धर्म त्रैमासिकासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा.

*श्री. प्रकाश भा. दीक्षित, ३०२, दुर्गा सोसायटी, कोलबाड, ठाणे ४०० ६०१. दू.क्र. : २५४७२००५, भ.क्र.: ९८१९६९३१९५/९०८२९९०४३१ अंकाच्या पाकिटाच्या पत्त्याच्या लेबलवर खालील माहिती छापली आहे.

सभासद क्रमांक वादे (वार्षिक देणगीदार सभासद), दीका (दीर्घकालीन सभासद), आ.(आजीव सभासद), कामे (कायम भेट)'वादे' व 'दीका' याच्या पुढे देणगी संपण्याचा महिना व वर्ष नोंदविलेले असते.

**- संपादक**

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार | ४ |
| कालभैरवाष्टकम्। | ५ |
| गीतकृष्णायन-भाग ६-युगांत | ६ |
| बादरायणचा संबंध | ८ |
| वराहपुराणातील श्री गीता महात्म्यम् | ९ |
| प्रारब्ध | १२ |
| ज्ञान आणि ज्ञान व्यवस्थापन | १६ |



**सद्धर्माची प्रकाशने**

(पोस्टेज सह)

| | | |
|---|---|---|
| १) | सुलभ संध्या व पूजा | रु. ५ |
| २) | श्री गणेश चतुर्थी पूजाविधि | रु. ५ |
| ३) | हरितालिका पूजा विधि | रु. १० |
| ४) | श्री सत्यनारायण पूजा व कथा | रु. १५ |
| ५) | कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) | रु. १० |
| ६) | तुलसी विवाहविधि | रु. १० |
| ७) | पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) | रु.२५ |
| ८) | कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक (या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.) | रु.१५ |
| ९) | सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) | रु.३० |
| १०) | उपासना | रु. ४० |
| ११) | श्रीरामरक्षेतील व्याकरण | रु. ५० |
| १२) | चांगदेव पासष्टी | रु. ४० |
| १३) | गंगालहरी | रु. २५ |
| १४) | गणपत्यथर्व शीर्षांतील व्याकरण | रु. ३० |
| १५) | सांख्यदर्शन | रु. ३० |
| १६) | श्री लक्ष्मी पूजा विधीः (हस्तलिखीत) | रु. १५ |


- या अंकातील लेखकांच्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
- या त्रैमासिकातील मजकूर संपादकांच्या परवानगीशिवाय कोणीही कुठेही छापू नये.
- मनीऑर्डरने पैसे पाठविताना मनीऑर्डर फॉर्मवर आपला मोबाईल क्रमांक लिहावा म्हणजे संपर्क करणे सोपे पडते.
- सद्धर्माच्या लेखकांनी त्यांचा लेख इतर ठिकाणी पाठविणे असल्यास तो सद्धर्माच्या अंकात प्रसिद्ध झाला आहे असा उल्लेख करावा. **- संपादक**

परस्पर बँकांत जमा झालेल्या रकमांचा तपशील व दी.का. देणगीदारांची नावे अपरिहार्य कारणामुळे पुढील अंकात देण्यात येईल. **- संपादक**

## संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार

दि. दा. औटी

लेख ३९ वा

**धृतेन भोजनं कुर्याम्** [४१८]

जेविन तर तुपाशी नाहीतर उपाशी.

**नो चेद् स्थास्यामि उपोषितः।**
**भीतस्य च सदा पृष्ठे, तिष्ठति ब्रह्मराक्षसः** [४१९]

भीत्यापाठी ब्रह्मराक्षस.

**गते सलिले सेतुबन्धनेन किम्?** [४२०]

बैल गेला नी झोपा केला.

**स्थालीपुलाक न्याय।** [४२१]

शितावरून भाताची परीक्षा.

**तुंबीफल जलन्याय।** [४२२]

सुका भोपळा पाण्यावर तरंगतो.

सुका भोपळा नेहमी पाण्यावर तरंगतो. पण त्यात काही वजन टाकले तर तो साहजिकच पाण्याच्या खाली जातो. व्याकरण शास्त्रांमध्ये 'र्' ह्या व्यंजनची तशी प्रवृत्ति दिसून येते. 'र्' हे व्यंजन स्वरविरहित असते तेव्हा ते पुढील वर्णाच्या डोक्यावर जाते. उदा. धर्म, कर्म, वर्म इत्यादी. पण त्यात स्वर असला की तो खाली राहतो. उदा. पुनर् + अपि = पुनरपि. शंकराचार्य म्हणतात

**पुनरपि जननं पुनरपि मरणं।**
**जननी जठरे पुनरपि जननम्।।**

**दाता पञ्चदशं रत्नं, जामातो दशमो ग्रहः।** [४२३]

दानशूर मनुष्य हे पंधरावे रत्न आहे. समुद्रमंथनात १४ रत्ने मिळाली ''लक्ष्मीः कौस्तुभ पारिजातक सुरा ... इत्यादी. म्हणून दान करणारा त्या यादीत गेला. हल्ली तर देहदान, अवयव दान यांचे महत्त्व वाढते आहे. सासऱ्याकडून दानाची अपेक्षा करणाऱ्या जावयाला मात्र सुभाषितकाराने दहावा ग्रह म्हटले आहे.

**सुविचार्य यत्कृतं सुदीर्घकालेऽपि** [४२४]
**नय याति विक्रियाम्।**

चांगला विचार करून केलेले अनंत काळ पर्यंत टिकून राहते.

क्रमशः

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रे खुर्द, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८-२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

•••

**कालभैरवाष्टकम्।** (श्लोक दुसरा) दि. दा. औटी

**(शब्दार्थ, अन्वय, समास, अनुवाद आणि वृत्त)**

**भानुकोटिभास्वरं भवाब्धितारकं परं**
**नीलकण्ठमीप्सितार्थदायकं त्रिलोचनम्।।**

**कालकालमंबुजाक्षमक्षशूलमक्षरं**
**काशिकापुराधिनाथकालभैरवं भजे।।**

शब्दार्थ : भानु (पु.) सूर्य. कोटि किंवा कोटी (स्त्री.) १०० लक्ष, भास्वर (वि.) तेजस्वी. कोट्यः कोट्यः वा भानवः कोटिभान वः क.धा.। कोटिभानवः इव भास्वरः भानुकोटिभास्वरः उपमित क.धा.। तम् भव (पुं.) संसार जग. अब्धि (पुं.) समुद्र, भवः एव अब्धिः भवा ब्धिः रूपक क. धा. संसार रूपी सागर. भवसागर भवाब्धेः तारकः ष. तत्पु. भवाब्धितारकः तम्। भवसागर तरवून देणारा. पर - (वि.) श्रेष्ठ नीलकण्ठः - नीलः कण्ठः यस्य सः नीलकण्ठः बहु. तम्। ईप्सित (वि) इच्छिलेला. ईप्सितः अर्थः इप्सितार्थः क. धा. इप्सितार्थस्य दायकः ष. तत्पु. तम्। त्रीणि लोचनानि यस्य सः त्रिलोचनः बहु. तम्। कालस्य कालः कालकालः ष. तत्पु. तम्। अम्बुजाक्षम् - अम्बुनि जातम् अम्बुजम् स. तत्पु। अम्बुजम् इव अक्षिणी यस्य सः अम्बुजाक्षम् बहु.। तम्। अक्षशूलाम् - अक्षः शूलः यस्य सः अक्षशूलः बहु. तम्। शूल - पुं/नपुं अक्षरम् - न क्षरः अक्षरः नम् तत्पु.। अविनाशी - तम्।

काशिका - भजे हे ध्रुवपद आहे. याची टीका अगोदरच्या श्लोकाच्या शेवटी लिहिली आहे.

अन्वयः अहं भानुकोटिभास्वरं....

.... अक्षरं भजे। सर्व द्वितीयान्त विशेषणे कर्ता आणि क्रियापद यांच्यामध्ये येतील.

भावार्थ : ज्याचे तेज एक कोटी सूर्या इतके आहे, संसाररुपी महान सागर जो तरवून नेतो, ज्याचा कंठ नीळा आहे, इच्छिलेले देणारा जो आहे, त्रिनेत्रधारी जो आहे, काळाचाहीजो काळ आहे; कमळासारखे ज्याचे डोळे आहेत, तीक्ष्ण त्रिशूळ ज्याचा आहे व जो अविनाशी (शंकर) आहे, काशी क्षेत्राचा जो प्रमुख मालक आहे अशा त्या काळभैरवाला मी भजतो।।२।।

वृत्त : समवृत्त तूणक, प्रत्येक पादात १५- अक्षरे, यति - ७, ८ छानना गेल्या वेळेसारखीच.

इति शुभम्।

क्रमशः

दि. दा. औटी

•••

**'शापवाणी' – जाती कोकिला**

माता म्हणुनी माझे काळिज आक्रोशे फुटते
हरी मी शाप तुला देते ।। धृ ।।

ठाउक मजला तुझाच हेतू
ना मम पुत्रांविषयी किंतू
जग सावरण्या मारविले तू
क्षमा करावी माता तरिही पुत्रांस्तव रडते ।।१।।

काय सांगणे हरि तुज आता
स्वयेच असशी जगता माता
पुत्रसुखाचा वियोग होता
काय करु मी जगू कुणास्तव अघटित ते घडते
।। २ ।।

जरि कर्तव्या तुवाच केले
कुलक्षयासी का न टाळले
विधी लिखितही तुवाच लिहिले
सांग केशवा असाध्य तुजला कार्य काय होते
।। ३ ।।

ऐक शोक ती करी उत्तरा
आप्त त्यागता प्राणां समरा
कुरुक्षेत्रीचे ते दिन अठरा
कुलास लांछन भीषण करती होत्याचे नव्हते
।। ४ ।।

अपार दुःखा कारण होसी
परतुनी सारे तेच भोगसी
पाळ घातले ज्या नियमांसी
अबला माते वदनामधुनी शापवाणि उठते ॥५॥

तुझ्या कुलाचा असाच होवो
नाश झुंजता सारे जावो
नीज लोचनी ते तू पाहो
बेसावध तू असता वनचर हरील प्राणांते ।।६।।

सर्वनाश होता शोकाकुल
यादवनारी अशाच रडतिल
दुःखे त्यांच्या दग्ध भूमितल
या शब्दांनी जगदीशाचा निरोप मी घेते ।।७।।

गांधारीनं दिलेल्या शापाला स्थिर शब्दांत कृष्णानं उत्तर दिलं, माते, प्रारब्ध कोणालाही चुकलं नाही. मीही त्याला कसा अपवाद असेन?

कृष्णाचं जीवितकार्य संपू पहात होतं. जेव्हा पृथ्वीतलावर धर्माला ग्लानी आली होती तेव्हा अधर्माचं उच्चाटन करण्यासाठी त्यानं जन्म घेतला होता. आयुष्यभर त्यानं दुष्टांचा संहार केला होता. साधुजनांचं रक्षण केलं होतं. धर्माचं राज्य सर्वत्र प्रस्थापित केलं होतं. भरतखंडात आता युधिष्ठिराचं धर्मराज्य स्थापन झालं होतं. उत्तरेच्या पोटी मृतावस्थेत जन्माला आलेल्या पांडवांच्या एकमेव उत्तराधिकाऱ्याला, परीक्षिताला, जीवनदान देऊन पांडवांचा वंशदीप त्यानं तेवत ठेवला होता. युधिष्ठिराकरवी पुनश्च अश्वमेध यज्ञ करवून उरल्यासुरल्या दुष्प्रवृत्तींची पाळंमुळं खणून काढली होती.

आता जीवनाची संध्याकाळ दिसू लागली होती. करण्यासारखं काही उरलं नव्हतं.

कृष्णानं अवतार समाप्तीपूर्वी आपल्या सर्व प्रियजनांची कोणतीही एक इच्छा पूर्ण करण्याचा संकल्प केला. त्यानुसार सर्वांचं मागणं पूर्ण करत तो कुंतीपाशी येऊन म्हणाला, आत्या, तुला काय देऊ?

मंद हसून कुंती म्हणाली...

**'मागणे' – जाती कालगंगा**

श्रीहरी देऊ नको मज रत्न वा आभूषणे
दुःख दयावे संगतीला एक तुजला मागणे ।।धृ ।।
वीरपत्नी वीरमाता ना मला काही कमी
संपदा येई करां जोडून जी मागेन मी
विश्वनाथा तूच जेव्हा देत सौख्याची हमी
कुंतिच्या संतुष्टतेला आज ना काही उणे ।।१ ।।

येतसे माझ्या जरीही सर्व स्वप्नां पूर्तता
जाणवे त्यातील मजला एक तरिही न्यूनता
विसरुनी कृष्णा तुला मी त्या सुखांना भोगता
आर्त राहे मी जरी फिटते तनूचे पारणे ।।२ ।।

जी सुखे कृष्णा तुलाही विस्मराया लावती
काय सांगावे करू मी घेउनी ती भोवती
यापरी दुःखे बरी जी सर्वदा मज ठेवती
लीन श्रीचरणी तुझ्या इतुकेच माझे बोलणे ।।३।।

सागराला या भवाला आज आहे लंघणे
आपुल्या ब्रीदास तुजही आज आहे पाळणे
श्रीहरी विनतीस यास्तव आज आहे ऐकणे
जाणता तू काय तुजला अन्य काही सांगणे ।।४।।

गांधारीचा शाप खरा ठरू पहात होता. भारतीय युद्धात वाचलेल्या यादवांची मनं अहंकारानं व्यापली होती. ते मदिरापान करू लागले होते. क्षुल्लक कारणांवरून एकमेकांशी तंडू लागले होते. श्रीकृष्णाच्या सुवर्णनगरीत आपल्या उन्मत्त वर्तनानं उपद्रव होऊ लागले होते. ते बघून जाण्यापूर्वी आपण मांडलेला पसारा आवरून जावं अशी कृष्णालाही प्रेरणा होऊ लागली होती.

कार्तिक वदय अमावास्येला सूर्यग्रहण होतं. यादवांनी त्या दिवशी प्रभासक्षेत्री समुद्रस्नानास जावं असं कृष्णानं सुचवलं. तिथे जाऊन यादव मदिरापान करून धुंद झाले. अनाचार करू लागले. एकमेकांचा संहार करू लागले. क्षुब्ध होऊन कृष्णही त्या अनाचारी यादवांचा नाश करू लागला. अखेर त्या दिवशी संपूर्ण यादव कुल प्रभासक्षेत्री समुद्रतीरावर एकमेकांशी लढून नष्ट झालं. केवळ स्वतः कृष्ण, बलराम, दीर्घ रुदन करणाऱ्या स्त्रिया आणि बालके एवढीच काय ती त्या हाहाःकारातून वाचली.

निर्मोही कृष्ण त्यांना घेऊन द्वारकेला परतला. सरळ वसुदेवाच्या प्रासादात जाऊन त्यानं यादव स्त्रिया आणि मुलं वसुदेवाच्या स्वाधीन केली. शंकित होऊन वसुदेवानं विचारलं, कृष्णा, तू या सर्वांना माझ्या स्वाधीन का करतोयस? तुला झालंय तरी काय?

तात, यांना तुमच्यावर सोपवून मी प्रभासक्षेत्रानजीकच्या वनात जाईन म्हणतो.

(पृष्ठ २८ वर)

एक गाव होते. त्या गावात एक ब्राह्मण कुटुंब रहात होते. कुटुंबातील सर्वच सद्विचारी-सदाचारी होते. आतिथ्य हा तर सर्वांचा स्थायीभाव होता. रोज जेवायला बसताना गृहिणी दार उघडून 'कोणी अतिथी आहे का?' असा पूकारा करून असेल तर त्या अतिथीस आदरपूर्वक आत बोलावून आपल्याबरोबर पंक्तीस बसवून घेऊन पोटभर जेवू घालीत असे. मोठे सुखात आणि आनंदात आपले जीवन व्यतीत करीत होते.

एके दिवशी असाच पुकारा करण्यासाठी दार उघडले असता घरासमोरील अंगणात एक गृहस्थ आपली बैलगाडी लावत असलेले दिसले. त्यांनी सावकाश बैलगाडी लावली. बैल मोकळे करून झाडापाशी बांधले. बैलासमोर वैरण घातली. मग त्या गृहिणीच्या पुकाऱ्यास प्रतिसाद देत म्हणाले- माऊली, मी यावे का?

अतिशय आदरपूर्वक तिने त्या सद्गृहस्थास आत घेतले. हातपाय धुण्यास पाणी दिले. पतिदेवांशेजारी पाट मांडून भोजनास बसविले पोटभर जेवू घातले. असे काही दिवस त्या गृहस्थाचे यथायोग्य आतिथ्य झाल्यावरही ते स्वगृही जाण्याचे नावही काढीनात! तेव्हा दोघांच्या मनांत शंका निर्माण झाली. हे गृहस्थ आहेत तरी कोण? पत्नीस वाटले - पतिदेवांच्या परिचयातील अथवा दूरच्या नात्यातील असतील! पतीदेवांस वाटले - पत्नीच्या माहेराकडील कोणी असावेत! शेवटी दोघेही एकांतात असताना परस्परांस आपल्या मनातील विचार बोलून दाखवले. तेव्हा त्यांच्या ध्यानी आले की हा कोणाच्याही नात्यागोत्यातील नाही. आपणास फसवीत आहे. आपल्या चांगुलपणाचा गैर फायदा घेत आहे.

एके दिवशी त्या दोघांनी ठरवून, पाहुण्यास समोर बसवून विचारायचे ठरविले. दुपारी भोजनोत्तर विश्रांतीसमयी त्यास तसे विचारलेही आपण कोण? आमच्यापैकी कोणीही आपणास ओळखीत नाही. तुमचा-आमचा संबंध (नाते) तरी का? तेव्हा हसत हसत पाहुणे म्हणाले, अहो, असे काय करता? असे का बरे विचारता?

अस्माकं बदरी चक्रं युष्माकं बदरीतरुः
(बदरीतरुः बोराचे झाड)
वादरायण संबंधात् यूर्य, वयं वयं यूयम्।।
('यूयं यूयं वयं वयम्' असाही पाठभेद आहे)

अर्थात - अहो, आमच्या बैलगाडीचे चाक बोराच्या झाडाच्या लाकडापासून बनविले आहे आणि तुमच्या घराच्या अंगणातही हे बोराचे झाड नाही का? मग या बोरीच्या झाडामुळेच ('बादरायण') तुमचा आमचा संबंध/नाते आहे हो!

**श्रीकांत अनंत बर्वे**

●●●

## वराहपुराणातील श्री गीता महात्म्यम् (पृथ्वी व भगवान श्रीविष्णू यांचेतील संवाद)

वसंत गोडबोले

श्रीगणेशाय नमः।
श्रीराधारमणाय नमः।

**धरोऽवाच**

भगवन परमेशान। भक्तिरव्याभिचारिणी।
प्रारब्धं भुज्यमानस्य कथं भक्ति हे प्रभो ।।१।।

अर्थ : पृथ्वीदेवीने भगवान श्रीविष्णूंना विचारले की हे भगवंता परमेश्वरा! प्रारब्धाचे भोग भोगीत असलेल्या मनुष्यांच्या ह्दयामध्ये आपली अनन्यभक्ति (अव्यभिचारी भक्ति) कश्यामुळे उत्पन्न होईल? ते सांगावे.

**श्रीविष्णुरुवाच**

प्रारब्ध भुज्यमानो हि गीताभ्यासरतः सदा।
स मुक्तः समुखी लोके कर्मणा नोपलिप्यते ।।२।।

अर्थ : भगवान श्रीविष्णू म्हणाले की प्रारब्धाचे भोग भोगत असतांनाही जो मनुष्य सदैव गीताभ्यासात रत असतो, तो संसारात असूनही मुक्त व सुखी असतो तो कर्मने लिप्त होत नाही (कर्माचा मळ त्याचे अंगी लागत नाही)

महापापादिपापानि गीताभ्यास करोति चेत्।
कचित्स्पर्श न कुर्वान्ति नलिनीदलमम्बुवत ।।३।।

अर्थ : कमलपत्राला जसा पाण्याचा लेप लागत नाही त्याचप्रमाणे गीताध्यान (गीतेचा वा गीतोक्त ज्ञानाचा अभ्यास) करणाऱ्या मनुष्यास पंचमहापातकादि पापे स्पर्श करू शकत नाहीत.

गीतायाः पुस्तकं यत्र यत्र पाठः प्रवर्तने।
तत्र सर्वाणि तीर्थानि प्रयागादिनी तत्र वै।।४।।

अर्थ : जेथे जेथे गीतेचे पुस्तक असते व गीतापाठ होत असतो तेथे प्रयाग आदि सर्व तीर्थे वास करतात.

सर्वे देवाश्च ऋषयो योगिनः पन्नगाश्च ये।
गोपाला गोपिका वापि नारदोद्धव पार्षिदैः।
सहायो जायते शीघ्रं यत्र गीता प्रवर्तते।।५।।

अर्थ : जेथे गीताभ्यास चालत असतो तेथे सर्व देव, ऋषि, योगी, सर्पराज, गोपाल, गोपी, नारद, उद्धव व पार्षद गणांसह परमेश्वर /परमात्मा उपस्थित राहून साह्य देतात.

यत्र गीता विचारस्य पठनं पाठनं श्रुतम्।
तत्राहं निश्चित पृथ्वी निवसामि सदैव हि।।६।।

अर्थ : जेथे गीतेचा विचार, गीतेचे अध्ययन, गीतेचे अध्यापन व गीता श्रवण चालत असते हे पृथ्वी तेथे मी निरंतर निश्चित रहात असतो. (माझा तेथे निश्चितपणे निरंतर वास असते)

गीताश्रयेऽहं तिष्ठामि गीता मे चोत्तमं गृहम्।
गीताज्ञानमुपाश्रीत्य त्रींल्लोकान्यालयाम्यहम् ।।७।।

अर्थ : मी गीतेच्या आश्रयाने राहतो. गीता हेच माझे उत्तम गृह आहे. मी त्रैलोक्याचे पालन गीताज्ञानाचा आश्रम करूनच करतो.

गीता मे परमा विद्या ब्रह्मरुपा न संशयः।
अर्धमात्राक्षरा नित्या स्वानिर्वाच्चपदात्मिका ।।८।।

अर्थ : गीता ही माझी परमश्रेष्ठ ब्रह्मरुपीणी विद्या आहे हे निःसंशय. ही अविनाशी अर्धमात्रारुपिणी असून नित्य अनिर्वाच्य पदात्मिका आहे.

चिदानन्देना कृष्णेन प्रोक्ता स्वमुखात्तोऽर्जुनम्।
वेदत्रयी परानन्दा तत्वार्थ-ज्ञानसंयुता ।।९।।

अर्थ : गीता चिदानन्दस्वरुप श्रीकृष्णाने अर्जुनाला स्वमुखे सांगितली आहे. ती त्रय वेदरुपिणी परमानंदस्वरुप व तत्वार्थज्ञान (तत्वज्ञान) याने भरलेली आहे.

योऽष्टादशजपो नित्यं नरो निश्चलमानसः।
ज्ञानसिद्धिस लभते ततो याति परं पद्म।।१०।।

अर्थ : जो मनुष्य निश्चलमनाने नेहमी अठराही अध्याय पठण करतो त्याला ज्ञानसिद्धीचा लाभ होवून परमपद प्राप्त होते.

पाठेऽसमर्थः संपूर्ण ततोऽर्ध पाठमारेत।
तदा गोदानज पुण्य लभते नात्र संशयः।।११।।

अर्थ : सर्व अठरा अध्याय नेहमी पठण करणे अशक्य असल्यास अर्धी गीता (९ अध्याय) पठण करावी. त्यामुळे त्यायोगे त्यास गोदानाचे (गाय दान केल्याचे) पुण्य मिळेल यात संशय नाही.

त्रिभागं पठमानस्तु गङ्गास्नानंफलं लभेत।
षडंश जपनास्तु सोमयागंफलं लभेत।।१२।।

अर्थ : अर्धी गीता (९ अध्याय) पठण करणे शक्य नसेल तर एकतृतियांश (६ अध्याय) गीता रोज पठण केल्यास गंगास्नानाचे फळ मिळेल व एकषष्ठांश (३ अध्याय) नित्य पठण केल्यास सोमयागाचे फळ मिळेल.

एकाध्यायं तु यो नित्यं पठते भक्तिसंयुतः।
रुद्रलोकमवाप्नोति गणो भुत्वा वसेच्चिरम्।।१३।।

अर्थ : भक्तिभावाने रोज एक अध्याय पठण केला असता रुद्रलोकाची प्राप्ती होऊन तो मनुष्य तेथे (रुद्रलोकी) रुद्राचा गण होवून चिरकाल वास करील.

अध्याय श्लोकपादं वा नित्ययः य पठते नरः।
स याति नरतां यावन्मन्वन्तरं वसुंधरे।।१४।।

अर्थ : हे वसुंधरे (पृथ्वी) जो नर (मनुष्य) एक अध्याय वा एक श्लोक, कमीतकमी (निदानपक्षी) श्लोकाचा एक चरणही नित्यनियमाने पठण करील, तो मनुष्य या मन्वंतरापर्यंत (युगापर्यंत) नरश्रेष्ठ होऊनही जन्मास येईल.

गीतायाः श्लोकदशकं सप्त पश्वः चतुष्टयम।
द्रौ त्रिनेकं तदर्थ वा श्लोकांना यः पठेन्नर।।१५।।

अर्थ : गीतेच्या श्लोकांपैकी दहा, सात, पाच, चार, तीन, दोन एक वा अर्धाही श्लोक जो मनुष्य नित्य पठण करील तो -

चंद्रलोकमवाप्नोतिवर्षाणायुतं ध्रुवम।
गीतापाठ समायुक्तो मृतो मानषुतां व्रजते।।१६।।

अर्थ : तो मनुष्य चंद्रलोकात दहाहजार वर्षेपर्यंत वास करील. गीतापाठ म्हणत असतांना वा ऐकत असतांना जो मनुष्य मरण पावेल त्याला मनुष्यजन्म मिळेल (मानवजातीत जन्म घेईल)

गीताभ्यासं पुनः कृत्व लभ्यते मुक्तिमुत्तमाय।
गीतेत्युचारसंयुक्तो क्रियमाणो गति लभेत ।।१७।।

अर्थ : तो मनुष्य (वरीलप्रमाणे मानवजातीत/ योनीत जन्मलेला) पुन्हा गीताभ्यास करून मुक्ति मिळविल. त्याने मरतांना फक्त 'गीता' एवढाच उच्चार केला तरी त्यायोगे तो मग चांगल्या गतीला जाईल.

गीतार्थ श्रवणसक्तो महापापयुतो पि वा।
वैकुण्ठं समवाप्नोति विष्णुना सह मोदते ।।१८।।

अर्थ : गीतार्थ श्रवणासक्त मनुष्य महापापी असला तरी तो वैकुंठाला जाईल व श्रीविष्णूबरोबर आनंदभोग भोगील.

गीतार्थ ध्यायेत नित्यं कृत्वा कर्मणि भूरिश।
जीवन्मुक्त स विज्ञेयो देहान्ते परमं पदम्।।१९।।

अर्थ : जो मनुष्य गीतेचे निरंतर असे अनुसन्धान अनेक कार्य करीत असतांनाही ठेवेल, तो देहान्त झाल्यावर जीवन्मुक्त होईल व परमपद पावेल.

गीतामाश्रित्य वहवो भूभुजो जनकादयः।
निर्धतकल्मषा लोके गीता याताः परं पदम।।२०।।

अर्थ : जनकासारखे अनेक राजर्षि गीताज्ञानाचा आश्रय करूनच निष्पाप झाले व परमपदास पोचले अशी गीतेची ख्याती आहे.

गीतायाः पठनं कृत्वा माहात्म्यं नैव यः पठेत्।
वृथा पाठो भवेतस्य श्रम एव ह्युदाहृत।।२१।।

अर्थ : गीतेचे पठण करून जो हे माहात्म्य वाचणार (पठण करणार) नाही, त्याचा तो गीतापाठ व्यर्थ, तो केवळ वाचनश्रमच होय असे तज्ज्ञ जनांचे म्हणणे आहे.

एतन्माहात्म्य संयुक्त गीताभ्यासं करोति यः।
स तत्फलमवाप्नोति दुर्लभा गतिसाप्नुयात् ।।२२।।

अर्थ : जो गीतेचा अभ्यास या माहात्म्यासहित करतो / करील, त्याला पूर्वोक्त फळ प्राप्त होऊन दुर्लभ गति मिळत असते.

**सूत उवाच**

महात्म्ययेत द्वितीया मया प्रोक्तं सनातनम्।
गीतान्ते च पठेद्यस्तु यदुक्तं तत्फलं लाभेन ।।२३।।

।। इति श्रीवाराहपुराणे श्रीगीतामाहात्म्यम् संपूर्ण ।।

अर्थ : सूत म्हणतात जो मनुष्य गीतापाठानंतर मी सांगितलेले गीतेचे सनातन महात्म्य पठण करील त्याला वर सांगितलेले फळ मिळेल.

याप्रमाणे वराहपुराणात असलेले हे गीतामाहात्म्य संपूर्ण झाले.

(संकलन, मराठी अर्थ व हस्ताक्षर लेखन)

**वसंत गोडबोले**
फ्लॅट नं.५, दीपाली अपार्टमेंटस्,
१२४, शनिवार पेठ (नेनेघाट),
पुणे - ४११०३०
भ्रमणध्वनी : ९४२३८५८८२३

●●●

कार्यकारणभाव व तर्कानुमान यांना विज्ञानशास्त्रात फार महत्त्व आहे. या दोन प्रक्रियांचा पाठपुरावा करूनच विज्ञानाची प्रगती होत असते. माणसाच्या दैनंदिन व्यावहारिक आचरणामध्येही बहुतांशी ''कार्यकारण न्यायाचा'' आपल्याला प्रत्यय येतो. जसे चांगला अभ्यास केला तर परीक्षेत चांगले यश मिळते. आपण दुसऱ्याशी चांगले वागलो तर दुसरे आपल्याशी चांगले वागतात. आपण वाहतूक नियम मोडला तर अपघात होऊ शकतो. पण माणसाच्या आयुष्यात मात्र अशाही काही घटना घडतात की, त्यांना माणसाच्या कृतीत कोणतेच कारण सापडत नाही. एखादा मनुष्य कोणतेही श्रम न करता लॉटरीचे तिकीट लागल्यामुळे अचानक कोट्याधीश बनतो. तर एखादा सच्छील माणूस, त्याचा कोणताच अपराध नसताना अपघात होऊन कायमचा पंगू बनू शकतो. अशा घटना दैवयोगाने होतात असे आपण म्हणतो.

वेदविद्येत सांगितलेल्या कर्माच्या सिद्धांताद्वारे मात्र अशा अपवादात्मक घटनांची कारणमीमांसा होऊ शकते.

कर्माच्या सिद्धांताप्रमाणे कोणतेही 'कर्म' कर्त्याने त्या कर्माचे फल भोगल्याशिवाय शान्त होत नाही. ज्या कर्मांचे फल भोगण्याचे राहते अशी सर्व कर्मे (या जन्मातील किंवा पूर्व जन्मांतील) संचित कर्माच्या यादीत जमा होतात. अशी माणसाच्या खात्यात जमा झालेली संचित कर्मे त्यांचे फल भोगण्यासाठी योग्यवेळी कर्त्याच्या (त्या माणसाच्या) पुढे उभी राहतात त्यांना 'प्रारब्ध' म्हणतात. प्रारब्धामुळे माणसांवर येणाऱ्या (वर उल्लेखिलेल्या) बऱ्यावाईट प्रसंगांचे कोणतेच कारण (या जन्मातील कर्मांत) आपणास सापडत नाही. परंतु वास्तविक ती संचित कर्मांची अभुक्त फळेच भोगण्यासाठी अचानक माणसाच्या पुढे उभी राहत असतात. त्याला कर्मसिद्धांतात 'प्रारब्ध' अशी संज्ञा आहे. ते प्रारब्ध कोणीही टाळू शकत नाही. साधुसंतच काय पण प्रत्यक्ष भगवंतालाहि मानवी अवतारात प्रारब्ध टाळणे शक्य होत नाही.

नामगीतेच्या आठव्या अध्यायात (श्री गोंदवलेकर महाराज) सांगतात –

**घटना अपघाती ज्या, न त्यां कारण सांपडे।**
**प्रारब्धे घडती त्या ची म्हणती दैव कारणें।।१।।**

**येई प्रारब्ध चालून पूर्वकर्मानुसार जे।**
**न चुके तेच सर्वांना, संत–देवासंही तसे।।२।।**

**प्रारब्धाचा नियम तो सर्वांना लागु सारखा।**
**देवाच्या अवतारी ही लागू त्याला हि तो तसा।।३।।**

**वनवासची रामाला कृष्णाला आळ चोरिचा।**
**ज्ञानेश्वर तुकाराम संतही सोसती छळां।।४।।**

तसे पाहिले तर प्रत्येक कर्मात कर्त्याच्या कर्तृत्वाबरोबर परिस्थिती व दैवाचा

थोडासा भाग असतोच. एखादेवेळी खूप परिश्रम करूनही यश बेताचेच मिळते; तर काही वेळा अगदी थोड्या श्रमांत घवघवीत यश प्राप्त होते.

भ. गीतेच्या १८ व्या अध्यायाच्या १४ व्या श्लोकात, भगवान् कोणतेही कर्म फलद्रुप होण्याची पाच कारणे सांगतात.

**अधिष्ठानं तथा कर्ता करणं च प्रथग्विधम्।**
**विविधाश्च पृथक् चेष्टा. दैवं चैवात्र पञ्चम्**
**।।१४।।**

मराठीत

**आधारक्षेत्र नी कर्ता तशी विविध साधने।**
**कृतिपद्धती नाना त्या दैव ते पांचवे असे।।१४।।**

कर्माच्या सिद्धांताप्रमाणे पूर्वजन्मींच्या व या जन्मांतीलही ज्या कर्मांचे फल आपण भोगावयाचे राहिले आहे ती संचित कर्मे त्यांचे फल भोगण्यासाठी चालून येतात त्यांनाच 'प्रारब्ध' म्हणतात. गीतेत सांगितलेले (कर्म-सिद्धीसाठी) पांचवे कारण जे 'दैव' ते दुसरे तिसरे काही नसून आपणच पूर्वी केलेल्या कर्माचे फल भोगण्यासाठी उभे राहिलेले प्रारब्धच होय. आपण केलेल्या प्रयत्नांचे फळ व त्यावेळी उभे राहिलेल्या प्रारब्धाचे फळ या दोघांची बेरीज-वजाबाकी होऊनच आपल्याला निव्वळ यश मिळते. आपण केलेल्या प्रयत्नांचा आणि मिळालेल्या यशाचा बरेच वेळा मेळ बसत नाही याचे कारणही हेच आहे; असे हे प्रारब्ध कोणीही टाळू शकत नाही, म्हणून प्रारब्ध टाळण्यासाठी संतांना किंवा देवाला गळ घालू नये. संत एखादे वेळी ते प्रारब्ध-दुःख पुढे मागे करू शकतीलही पण आज टळले तरी ते उद्या भोगावे लागणारच आहे. म्हणून महाराज सांगतात की 'प्रारब्ध दुःख झेलण्याठी मनोधैर्यच संत व देवाकडे मागावे'

**टाळण्या तरि प्रारब्ध संतांना विनवू नये।**
**टळले जरि ते आता भोगा लागे पुन्हाच ते ।।१७।।**

**प्रारब्ध जे उभे राही कोणी ना बदलू शके।**
**कर्म संचित खात्यात, असे तेच तरी मिळे।।६।।**

असे जर आहे, तर मग माणसाला प्रारब्ध-दुःख कमी करण्याचा किंवा त्यापासून मुक्त राहण्याचा काही मार्ग आहे का? असा प्रश्न उपस्थित होतो. त्याला उत्तर असे की प्रारब्ध जरी कोणी टाळू शकत नसला तरी त्याला सामोरे कसे जावयाचे व त्या प्रारब्ध-दुःखाचा आपल्याला भासणारा परिणाम कमी कसा करावा यावर मात्र उपाय आहे व तो करण्याचे स्वातंत्र्यही माणसाला परमेश्वराने दिले आहे.

**जावे कैसेचि प्रारब्धा सामोरे परि जे उभे।**
**स्वातंत्र्य ते असे अम्हां दैव निर्भर ते नसे।।७।।**

संतांना सुद्धा प्रारब्ध चुकवता येत नाही, ते त्यांना भोगावेच लागते, पण असे प्रारब्ध भोगत असताना संतांची मनःशान्ती मात्र अजिबात ढळत नाही. याचे उत्तम उदाहरण म्हणजे संत नामदेवांचे गुरु होण्याची पात्रता असणारे संत 'विसोबा खेचर'. त्यांचा एक पाय त्वचा रोगाने पूर्णपणे सडला होता, तो त्यांना हलवता येत नव्हता. त्यामुळे ते पूर्णपणे विकलांग झाले होते, तरी त्यांची मनःशान्ती

थोडीसुद्धा ढळली नव्हती. सतत ईश्वर चिंतनात मन व्यस्त असल्यामुळे त्यांची देहबुद्धी पूर्णपणे विलय पावून देव-बुद्धीने त्यांच्या मनाची पूर्णपणे ताबा घेतला होता. त्यामुळे त्यांच्या देहाला होणारे दुःख देहापर्यंतच राहून ते मनापर्यंत पोहचूच शकत नव्हते. महाराज म्हणतात –

**गती प्रारब्ध-दुःखांची देहापर्यंतची असे।**
**देहबुद्धी कमी होता, भासे दुःखचि सौम्य ते ।।८।।**

**मार्ग दाखविती संत सोडण्या देहबुद्धि ती।**
**नामात राहुनी नित्य रामाला ठेवुनी मनीं।।९।।**

**संतही भोगती त्यांचे राही प्रारब्ध जे उभे।**
**परी दुःख न बाधे त्यां, देहबुद्धीविनाच जे ।।१०।।**

**निर्द्वंद्वे समबुद्धीने झेलता दुःख येइ जे।**
**भासे सौम्य चि, जाचे ना, संत दाखविती जसे ।।११।।**

**आपत्ति येति जाती त्या पूर्वकर्मानुसार ज्या।**
**भक्तास बाधती ना त्या जो नामीं बुडवीच त्या।।१२।।**

थोडक्यात संत सांगतात की, 'प्रारब्ध टाळता येत नसले तरी प्रारब्ध-दुःख सौम्य करण्यासाठी देह-बुद्धी कमी करून देव-बुद्धी वाढवण्याचा मार्ग भक्तास उपलब्ध आहे.

देह बुद्धी कमी करून देवबुद्धीची वृद्धी करण्यासाठी संत भक्तांना परमेश्वराशी 'अनुसंधान' साधण्याचा मार्ग सांगतात.

आपल्याला एखाद्या व्यक्तीशी संपर्क (अनुसंधान) साधावयाचा असेल तर त्या व्यक्तीचा पत्ता माहित असणे आवश्यक असते, म्हणजे त्या पत्त्यावर आपण त्या व्यक्तीला भेटू शकतो. त्या व्यक्तीचा पत्ता माहित नसेल तर त्या व्यक्तीचा फोन क्र. माहित करून घेऊन फोनवर त्या व्यक्तीशी आपण संपर्क साधू शकतो.

कित्येक अब्ज प्रकाश वर्षांचे आकारमान असलेल्या ब्रह्मांडाचा निर्माता जो परमेश्वर तो आपल्यापासून इतका दूर असणार की त्याच्याशी अनुसंधान साधणे मानवाला केवळ अशक्य आहे. परंतु हा परमेश्वर विश्व निर्माण करून या विश्वाला व्यापून ही राहिला आहे. म्हणून त्याला 'विष्णू' ही संज्ञा मिळाली आहे. प्रत्येक जीवाच्या अंतरात तो अत्यंत सूक्ष्म रुपात केवळ साक्षीभावाने स्थित आहे.

विभूति योग नावाच्या भ. गीतेच्या दहाव्या अध्यायात (२० व्या श्लोकात) भगवान् म्हणतात.

**अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयास्थितः।**

मराठीत

**अंतरी सर्वभूतांच्या आत्मा स्थितचि मी असे।**

त्यामुळे परमेश्वराशी अनुसंधान म्हणजे आपल्या अंतरात अतिशय सूक्ष्मरुपात स्थित असलेल्या 'निहित गुहायाम्' अशा आत्मरुपाशीच अनुसंधान होय आणि त्यासाठी आपल्याला अंतर्यात्रा करूनच पंचकोशांनी वेढलेल्या (म्हणजे जणू गुहेत लपलेल्या) त्या आत्मारामाचा शोध घ्यावा लागेल. असा आत्मशोध घेण्यासाठी काही साधक

सर्वसंगपरित्याग करून हिमालयात जाऊन तपस्येचा मार्ग आचरत असत. तर काही ऋषी विवाहित असून पत्नीसह आरण्यात आश्रम बांधून (पातञ्जल योगाने) आत्मचिंतन करून आत्म्याशी अनुसंधान साधत असत. (उदा. वसिष्ठ याज्ञवल्क्य वगैरे) सामान्य संसारी माणसाला हे दोन्ही मार्ग आचरणे शक्य नसते म्हणून भागवत धर्माच्या साधुसंतांनी सामान्य माणसाला नामसाधनेचा मार्ग (आत्मानुसंधान साधण्यासाठी) दाखवून दिला आहे. हा नामसाधनेचा मार्ग जरी वरवर पाहता सोपा वाटला तरी तो सिद्ध होण्यास बरीच कठीण पथ्ये पाळावी लागतात.

ही पथ्ये कोणती? हे पटवून देण्यासाठी श्री गोंदवलेकर महाराजांनी नामसाधनेचे शेतीशी रुपक रंगवून वाचकांच्या मनावर फार समप्रकपणे ठसविले आहे. श्री गोंदवलेकर नामगीतेच्या 'नामसाधना' या दुसऱ्या अध्यायातील संबंधित श्लोक असे आहेत.

**नामरुपीच होतासी सदाचारण कुंपण।।**
**विषयांपार नामाला ठेवण्यास सुरक्षित।।७०।।**

**माती अवश्य शेताला काही ती भूसभूशित।**
**नामशेता तशी माती अंतःकरण शुद्धच।।७१।।**

**मृत्तिकेत नसावे त्या रेती दगड नी खर।**
**तैसे मनाच्या मातीत नसावे, देव-मत्सर।।७२।।**

**पीक उत्तम येण्यासी लागे ते बीज उत्तम।**
**नामासाठीच ते नाम निष्काम-बीज उत्तम।।७३।।**

**पर्जन्य-वृष्टि अंती ती अवश्य रोप वाढण्या।**
**भगवत् कृपेचा पाऊस मिळे तो योग्य साधका।।७४।।**

**मशागत अशी होता नाम-शेताचि नित्य ती।**
**नामसाधक मिळवी निश्चये परमार्थ ची।।७५।।**

अशी सर्व पथ्ये पाळून नाम उच्चाराने कळकळीने मारलेली हाक देवाला नक्की पोहचते व त्याला प्रतिसाद मिळाल्याचा अनुभव नाम-साधकास येतो, म्हणजेच परमेश्वराशी अनुसंधान सिद्ध होते.

असे अनुसंधान साधल्यावर साधकाची देहबुद्धी कमी कमी होऊन देव-बुद्धी वर्धमान होते आणि अशा नामसाधकास प्रारब्ध दुःखाचा त्रास होत नाही व प्रारब्ध भोगत असतानाही त्याची मनःशान्ती ढळत नाही व तो प्रारब्धापासून मुक्त राहून कर्मबंधापासून अलिप्त राहू शकतो.

भ. गीतेतील ९ व्या अध्यायात सांगितलेला राजगुह्य-राजयोग आचरल्यास साधक परमेश्वराशी अनुसंधान कसे साधू शकतो, यावर पुढील लेखात विचार करू.

**प्रारब्धं भुज्यमानो हि गीताभ्यासरतः सदा।**
**स मुक्तः सः सुखी लोके कर्मणा नोपलिप्यते।।**

**प्र. सि. मराठे**
४०२ सनफ्लॉवर, ठक्कर पार्क,
वाकोला, सांताक्रूझ (पूर्व),
मुंबई - ४०००५५
दूरध्वनी - २६६७२२०५
भ्रमणध्वनी - ९६१९८९६४३५

●●●

### ज्ञान व्यवस्थापनाची तोंडओळख

ग़ेली सुमारे १५ वर्षे प्रशिक्षण क्षेत्रांत 'ज्ञान' आणि 'ज्ञान व्यवस्थापन' या शब्द आणि संकल्पनांची चांगलीच चलती आहे. ज्ञान या शब्दाचा अर्थ आहे; अशी उपयुक्त संकल्पना अथवा माहिती की जिचा वापर केल्याने (औद्योगिक) जीवनांत येणाऱ्या संकटांना यशस्वीपणे तोंड देता येऊ शकते. सहसा प्रशिक्षण चालते ते औद्योगिक क्षेत्रांत त्यामुळे जीवनालाही 'औद्योगिक' हे कंसातील विशेषण लागले इतकेच. इंग्रजीत यालाच Knowledge and Knowledge Management असे म्हणतात. जर पुढे काय होणार आहे याचा अंदाज लागू शकला तर आगावू काहीतरी कृती करून परिस्थितीच्या वाईट परिणामास थोडे सौम्य करणे शक्य होईल तसेच काही खास सामर्थ्य लागणार असेल तर त्याचीही काहीतरी आगाऊ व्यवस्था करणे जमू शकेल. एवढे प्रचंड ज्ञानाचे लाभ होऊ शकतात.

पाश्चात्यांच्या विचारधारेनुसार एखादी अडचण काही अंमलांत आणण्याजोग्या संकल्पना अथवा माहितीचा वापर करून जर दूर करता आली तर ते ज्ञान होय. अशा ज्ञानांची नोंद घेऊन एखादे बाड बनवले तर या अशा ज्ञानबाडाचा उपयोग पुढे अशाच येणाऱ्या अडचणीवर मात करण्यासाठी होऊ शकेल. त्यांच्या विचाराप्रमाणे सारे परिणाम तर्कशास्त्राच्या कारणपरंपरेनुसारच होत असतात त्यामुळे असा केलेला ज्ञानाचा साठा फार उपयुक्त असतो.(यामुळेच बहुधा त्यानी पेटंट पद्धती अंमलांत आणली असावी). सध्या या ज्ञानसाधनेच्या विचारप्रसारामुळे अमेरिका आणि युरोपातही वेगवेगळ्या संस्थामध्ये ज्ञानबाडे बनवण्याची अहमहमिका लागलेली दिसते. त्यांच्या औद्योगिक संस्थानातही सध्या 'ज्ञानावर चालणाऱ्या संस्थांचा प्रचंड बोलबाला आहे. त्याची लागण आता भारतातही होताना दिसत आहे. महाराष्ट्र सरकारने २-३ वर्षांपूर्वी महाराष्ट्र राज्य ज्ञान महामंडळ (Maharashtra State Knowledge Corporation) स्थापले आहे. केंद्रीय सरकारनेही नुकतेच केंद्रीय ज्ञान आयोगाची (Central Knowledge Commission) स्थापना करण्याचा मनोदय जाहीर केला आहे. सध्या हे ज्ञान महामंडळ काय करते हे जाणून घेण्यासाठी नुकतेच मी त्यांच्या पुणे येथील कार्यालयाला भेट देऊन आलो. तेथे काय काम चालते याचा अंदाज घेण्याचा बेत होता. 'तुम्हाला वेबसाइट सुरू करायची असेल तर अर्ज करा आम्ही पैसे घेऊन ते तुमचे काम करून देऊ. आमच्याजवळ त्याचे संपूर्ण ज्ञान आहे' असे उत्तर मिळाले. पण पुण्यांत वेबसाइट उघडून देणारी खूप मंडळी आहेत मग सरकारने ही एक नवीन स्पर्धाच सुरू केलेली दिसते. एवढी कल्पना आली. मग याला ज्ञानभांडार किंवा ज्ञान महामंडळ हे

नाव योग्य किंवा यथार्थ आहे असे म्हणता येईल काय?

ज्ञान जमवण्यांत आपणही मागे राहू नये या हेतूने पुणे विद्यापीठाने यंदा ज्ञान विभाग (Department of Knowledge) स्थापन केला आहे. पुण्यातील ज्ञानी पंडितांना त्याची जाण व्हावी व त्याचाही सहभाग मिळवावा म्हणून विद्यापीठाचे कुलगुरू, विभागाचे डीन आणि सभासद यानी त्यासंबंधी एक सभा मराठा चेंबरमध्ये घेतली होती. त्यानी आपल्या संकल्पनेचे प्रदर्शन केल्यावर प्रश्नोत्तर काळांत ''अडचणीवर मात करणे शक्य असणाऱ्या संकल्पना आणि माहिती म्हणजे ज्ञान आणि विद्यापीठ अशा ज्ञानाचा साठा करून जरुरी असेल तेथे पोचवण्यासाठी कटिबद्ध असेल'' आणि 'हे ज्ञान जवळ असणारा स्वच्छ मनाचा असला पाहिजे' असले दोन विचार विद्यापीठाच्या या विभागातील अधिकाऱ्याजवळ असल्याचे उघडकीस आले. पाश्चात्याच्या विचारधारेत ज्ञानाशी (स्वच्छ) मनाचा तर काही संबंध असत नाही पण भारतीय विचारसरणी तर ज्ञानी माणसाचे ते मुख्य लक्षण मानते. तर भारतीय संकल्पनेत ज्ञानाचा साठा करता येत नाही तर पाश्चात्य तसे करू म्हणतात. या विरोधाभासामुळे ज्ञान या संकल्पनेचाच जरा सखोल अभ्यास करावा म्हणून ठरवले.

सहसा औद्योगिक व्यवसाय फायद्यासाठीच चालतो. एखाद्या वस्तूचे अगर सेवाभावाचे उत्पादन करण्याचा व्यवसाय असेल तर विक्रीतून येणाऱ्या पैशाच्या मानाने उत्पादनासाठी लागणाऱ्या खर्चाचे प्रमाण जितके कमी तेवढा फायदा जास्त त्यामुळे नेहमीच सारे व्यवसाय आपला उत्पादन खर्च जितका कमी करता येईल तितका कमी करण्याचा प्रयत्न करीत असतात. उत्पादनांत यंत्रांचा उपयोगही यामुळेच सुरू झाला. कोठलेही उत्पादन करायचे म्हणजे माणसांची गरज भासणारच. त्याचाही खर्च जास्त होऊ नये म्हणूनच पाश्चात्य राष्ट्रांत गुलामांचा व्यवसायही सुरू झाला. फायदा झालाच पाहिजे कोठलाही व्यवसाय करतांना. आपोआप चालू शकणारी मशिने निघाली; कच्चा मालही जितका तकलादू-आणि स्वस्त-मिळेल तोही वापरून झाला गिऱ्हाइके आपल्या काबूत असावीत म्हणून वसाहतवादही उदयास आला; जशीजशी लोकांत स्वातंत्र्याविषयीं आस्था आणि अनावश्यक पदार्थ आणि सेवांबाबत अनास्था वाढू लागली तसे उत्पादन खर्चात आणखी कपात करणे आवश्यक झाले. गुणवत्ता वलयें (Quality Circles) आणि शून्यदोष उत्पादन (Zero Defect Production) ही तंत्रेही वापरून झाली की ज्यायोगे माणूस आपल्या धनलोभापायीं उत्पादन खर्चांत काही कपात करू शकेल. तरीही उद्योगांचे समाधान होत नव्हते. पाश्चात्य संस्कृतीचा पायाच मुळी स्वार्थ, सत्ता आणि उपभोग यांच्या त्रिकोणावर उभा आहे. विद्वानांनी संशोधन करून निर्णय दिला की आता कोठल्याही उपचारांनी उत्पादन खर्चांत कमी होणे शक्य नाही. केवळ काम करणाऱ्या माणसांनी कामांत मन लावले

तरच काहीतरी आशा आहे.

मनुष्यप्राणी हा दैवी निर्मिती आहे व तो काहीही करू शकतो. विसाव्या शतकाच्या मध्यावर हे दृष्टीस आल्यामुळे मानवकार्यशास्त्र (Ergonomics) ही एक शास्त्रशाखाच सुरू झाली आणि औद्योगिक क्षेत्रानेही त्याचा फायदा उठवण्यास सुरुवात केली. माणसाला शारीरिकदृष्ट्या निरोगी आणि मानसिकदृष्ट्या संतुष्ट ठेवा म्हणजे तो कोठलेही काम लौकर व छानपैकी करू शकतो. पाश्चात्य संस्कृतीच्या मूलभूत उपभोगवादी वृत्तीमुळे हे त्या मंडळींना सहजपणे जमत नाही.

**पाश्चात्य विचारसरणीनुसार या बाबतीतील प्रगती**

माणसाचे जीवन हे चालते ते निसर्गशास्त्राच्या नियमानुसार. हे नियम माणूस गर्विष्ठपणामुळे समजून घ्यायचा प्रयत्न करीत नाही. आपल्या बुद्धीबळावर निसर्गाला नमविण्याचा विचार तो करु लागला व निसर्गापासून दूर गेला. निसर्गनियमाची सर्व कारके (Causes or Factors) केवळ बुद्धीलाच समजणारी (इंद्रियगोचर) नसतात कित्येक त्याहूनही सूक्ष्म (अगोचर) असतात. ती समजण्यासाठी प्रतिभेचा (Intuition) वापर करावा लागतो व ती तर निसर्गच देऊ शकतो. माणसाच्या जीवनांत अडचणी निर्माण होतातच. त्यांचे निराकरण होण्यासाठी त्याला काही संकल्पना आणि माहिती यांचा उपयोग करावा लागतो. ते ज्ञान असेल तर उपयोग यशस्वी होऊन जीवनांतील अडचणी दूर होऊ शकतात. माणसाने निसर्गापासून दूर गेल्यावर जीवनातील ज्ञान मिळवण्यासाठी अनेक शास्त्रे निर्माण केली व त्यांचे एकमेकाशी काहीही संबंध नाहीत अशी समजूत करून तो आपले जीवन व्यतीत करूलागला. केवळ आपल्या बुद्धीच्या आकलनशक्तीनुसार तो आपल्या जीवनांतील सर्व शास्त्राचे नियम बनवतो व जीवन त्यानुरूप चालले पाहिजे असा आग्रह धरून राहतो. गणनेविषयीं गणितशास्त्र, (Mathematics), पदार्थासंबंधीचे पदार्थविज्ञान (Physics), रसायनाबाबतचे ते रसायनशास्त्र (Chemistry), शरीरासंबंधीचे शरीरशास्त्र (Physiology), इत्यादि निव्वळ निसर्गशास्त्राच्या असलेल्या शाखा आणि समाजशास्त्र (Sociology), व्यवस्थापन (Management), अर्थशास्त्र (Economy), माहितीतंत्रशास्त्र (Information Technology) आदि मनुष्यस्वभावाचे मिश्रण असणारे निसर्गशास्त्राचेच प्रकार इत्यादिंचा माणूस स्वतंत्रपणे आखणी करून त्याचे आपापल्या परीने नियम बनवून अभ्यासत आहे. यापैकी एकेका विषयांत पदव्या मिळवून तो 'ज्ञानी' अथवा 'पंडित' म्हणवून घेऊ पहात आहे. निसर्गशास्त्राच्या कोणत्याही शाखेत बुद्धीखेरीज प्रतिभा सुद्धा कार्यकारणभावाच्या आकलनासाठी आवश्यक असल्यामुळे मनुष्याला त्याने सुरू केलेल्या कोणत्याही शास्त्रशाखेत शंभर टक्के किंवा पूर्ण ज्ञान होऊ शकत नाही कारण त्याला प्रतिभेची आवश्यकता समजत नाही व त्यामुळे ती मिळवण्याचा प्रयत्नही करता येत नाही.

मनुष्यस्वभावाचे मिश्रण असलेल्या शास्त्रांसंबंधी तर या प्रतिभेखेरीज मनुष्यस्वभावातील अनिश्चितपणाचेही परिणाम त्याला कळत नाहीत त्यामुळे तेही त्याला शत प्रतिशत समजू शकत नाहीत. या शास्त्रांच्या वापरांतही यामुळेच त्याला अनेक अडचणी येत असतात. मग त्यामुळे जीवनातही त्याला अनंत अडचणींचा सामना करावा लागतो आहे.

कोणताही निर्णय घेण्यासाठी सर्व परिस्थिती संपूर्णपणे माहिती असावी लागते तरच तो निर्णय आपल्या अपेक्षेप्रमाणे परिणाम देऊ शकतो. कोणत्याही (मनुष्यनिर्मित) शास्त्रातील प्रतिभा आणि अनिश्चित मनुष्यस्वभाव या अज्ञात कारकांमुळे केव्हाही (त्या शास्त्राच्या) वापरांत येणारी अडचण, ती परिस्थिती खात्रिशीर जाणता येत नसल्यामुळे, पूर्णपणे व निखालसपणे दूर करण्यासाठी योग्य तो निर्णय माणूस घेऊ शकत नाही. मग प्रत्यक्ष परिणाम काहीही होवो पण निर्णय घेण्यासाठी भ्रामक निश्चित परिस्थिती (Certainty) निर्माण करता यावी या हेतूने माणसाने संभाव्यतेच्या टक्केवारीचा (Probability) अंतर्भाव असलेले संख्याशास्त्र (Statistics) निर्माण केले आणि (परिणामांची चिंता न करता) निर्णय घेणे सुरू केले. खास करून निसर्ग शास्त्रातील एखाद्या घटनेचा माणसाने या संख्याशास्त्राच्या मदतीने केलेला अंदाज आणि प्रत्यक्ष घडणारी ती घटना यांत बहुतेक वेळां मेळ रहात नाही. भारतातील हवामानखात्याने दरवर्षी मोसमी पावसाचे प्रसिद्ध केलेले अंदाज आणि प्रत्यक्ष पडणारा पाऊस हे या प्रकाराचे उत्तम उदाहरण आहे. त्यांचे संख्याशास्त्र, तसेच मोसम सुरू होण्यासाठीची (बुद्धीला समजलेली) कारके गेल्या ५०-६० वर्षाच्या मोसमी पावसाच्या आलेखावर (Records) अवलंबून असतात आणि दरवर्षी आपले अंदाज आणि प्रत्यक्ष होणारी जलवृष्टी यातील तफावतीच्या कारणांचा उहापोह करत आपल्या गृहीत कारकांत काहीतरी बदल करण्याचा आपला मानस ते खाते जाहीर करीत असते. अंदाज प्रत्यक्ष पावसाच्या वेळेच्या जितका आधी वर्तवला असेल तेवढे प्रतिभेचे प्रमाण त्या कार्यकारणभावांत जास्त असते. भारतीय हवामान खाते हवामानाचे विज्ञान बनवून आपल्या बुद्धीच्या जोरावर निसर्ग घटनांची चाहूल घेण्याचा प्रयत्न करीत असते. अर्थातच त्याविषयीच्या ज्ञानासाठी विज्ञानाबरोबर प्रतिभेची जोड हवामानशास्त्रज्ञ देऊ शकत नाही व त्यामुळे त्याचे ज्ञान अपूर्णच रहाते. याचबरोबर दर वर्षी पंचांगात येत असलेले नक्षत्रानुरूपचे पर्जन्यमान बऱ्याच अंशी बरोबर येते याची जाणीव ठेवली म्हणजे हवामानाच्या विज्ञानांत आणि पंचांगकर्त्यांच्या ज्ञानांत नक्कीच फरक असल्याचे उमगून येते.

**या ज्ञानाबाबतची सांप्रतची परिस्थिती**

भारतीय महासागराभोवतालची इंडोनेशिया, थायलंड, श्रीलंका आदि राष्ट्रांनी विकसित राष्ट्रांकडून त्सुनामी सारख्या नैसर्गिक घटनांविषयीं आगाऊ माहिती मिळावी म्हणून कित्येक उपकरणें (Instruments) आपापल्या

किनाऱ्यांवर बसवून घेतली होती तरीही भारताप्रमाणेच त्यांचेवर डिसेंबर २००४ मधील त्सुनामीने चांगलाच सूड उगवला. त्यानी ज्ञानापैकी फक्त विज्ञानावरच मदार ठेवली होती त्यामुळे त्सुनामीची पूर्ण जाणीव त्यांना होऊ शकली नाही. लाखो माणसे प्राणांस मुकली. या त्सुनामीग्रस्त प्रदेशातील प्राणी आणि पशू तसेच शास्त्र न शिकलेले (म्हणजे निसर्गापासून दूर न गेलेले) वनवासी ओंगी, जारवासारखे मानवसमाज यापैकी कोणीही या अपघातात बळी पडले नाहीत; निसर्गाने त्यांना अगोचर मार्गाने सूचना देऊन पीडाग्रस्त जागेतून ऊंच जागेकडे जाऊन जीव वाचवण्याचे ज्ञान दिले होते! शास्त्राचे ज्ञान घेतलेले 'विकसित' किंवा 'ज्ञानी' म्हणवून घेणारे आम्ही लोक मात्र त्यानाच 'अविकसित प्राणी', 'पशू' किंवा 'अडाणी' समजतो हे विशेष!

पाश्चात्य देशांकडून आलेल्या व्यवस्थापन या औद्योगिक विश्वासंबंधीच्या शास्त्राची एम बी ए (MBA) ही पदवी भारतातही खूप लोकप्रिय आणि नोकरी मिळण्याचे दृष्टीने उपयुक्त ठरली आहे. औद्योगिक संस्थानांमध्ये कोणत्याही विभागांत सामानसुमान (Materials), वस्तूनिर्मिती (Production), खपवृद्धी (Marketing), मानवविकास (Human Resource Development), अर्थव्यवहार (Finance/ Accounting) इत्यादि विषयांत खास प्राविण्य मिळवून एम बी ए झालेली व्यवस्थापक मंडळी नोकरीवर असतात. आता कंपनी चालवताना सगळंच काही नेहमी योजल्याप्रमाणे घडत नाही. काहीतरी अडचणी प्रगतीत येतातच. त्याचे निराकरण करण्यासाठी काही उपाययोजना कराव्या लागतात. प्रत्यक्ष व्यवहारांत अशा अडचणी आल्या तर या एम बी ए मंडळींनाच त्याच्या निराकरणासाठी योजना आखावी लागते. कंपनीच्या व या व्यवस्थापक मंडळींच्या आयुष्यांत असे कित्येक प्रसंग येऊ शकतात. वेगवेगळ्या अडचणींवर कशी उपाययोजना करायची हे ठरवण्यासाठी त्यांना फार त्रास होऊ नये म्हणून त्यांच्या एम् बी ए च्या अभ्यासक्रमांत (प्रत्येक विषयांतच)'केस स्टडीज' म्हणून शिकवण्याची एक पद्धत आहे. कोणत्याही औद्योगिक संस्थानांत काहीतरी अडचण उद्भवलेली असते मग त्या परिस्थितीचे जितके सविस्तर वर्णन करता येईल तितके करून विद्यार्थ्यांना त्याची उकल करण्यासाठी त्यांनी घेतलेल्या शिक्षणातून मार्ग काढायचा असतो. अडचण जरी सारखीच असली तरी सारी परिस्थिती काही अगदी एकसारखीच नसते त्यामुळे एकच उपाययोजना सर्वत्र लागू होऊ शकत नाही. आणि हीच या शिक्षणपद्धतीतील मेख असते. विद्यार्थ्यांना साऱ्या अडचणींवर एकसारखेच उपाय न सुचवता परिस्थितीनुरूप आढावा घेता यावा आणि विद्यार्थ्यांच्या मनातील विचारांची लवचिकता वाढावी ही त्या पद्धतीमागील मुख्य संकल्पना आहे एखाद्या ठिकाणी एखादी उपाययोजना यशस्वी झाली तर तसल्या अडचणीवर तीच उपाययोजना

असा सरळ प्रकार नसतो. त्यामुळे यशस्वी उपाययोजना लिहून ठेऊन ते बाड (ज्ञानकोष म्हणून) पुढच्यावेळी उपयोगासाठी तयार ठेवून चालणार नाही. शिवाय ज्या एका विभागांत (मटीरियल्स, मार्केटिंग, पर्सोनल अगर देखभाल) अडचण निर्माण झाली असेल तर ती दूर करण्यासाठीचा उपाय दुसऱ्याच विभागात क्रिया करावी लागणे असू शकतो; अडचण सहन करणाऱ्याच विभागातील निपुण ती अडचण दूर करू शकेल अशीही खात्री नसते. सारे विभाग एकमेकांवर अवलंबून असतात.

तशीच मानवनिर्मित पदार्थविज्ञान, रसायन, शरीरविज्ञान वगैरे शास्त्रेही निसर्गशास्त्राचे अथवा जीवनशास्त्राचेच विभाग असल्यामुळे स्वतंत्रपणे सर्वच कार्ये करू शकत नाहीत. कोणत्याही शास्त्रशाखेतील अत्त्युच्च शिक्षण घेतलेल्याला 'तत्वज्ञानातील निष्णात' (Doctor of Philosophy, i.e. Ph.D) हीच पदवी मिळते. मग एकाच विभागीय शास्त्रांत अत्त्युच्च शिक्षण घेतलेल्याला तरी ज्ञानी म्हणता येईल काय? तत्वज्ञानातील निष्णाताला ज्ञानी जरूर म्हणता येईल.

पुढे उपयोग करण्यासाठी मिळणाऱ्या ज्ञानाच्या संकल्पनेवरून मला आमच्या प्राथमिक शाळेच्या क्रमिक पुस्तकांतील 'चिमुकला विनू' ही गोष्ट सांगाविशी वाटते. विनू हा एक चार वर्षाचा मुलगा एका गांवांत रहातो त्याची मावशी त्याच्याच घराजवळ एखाद्या फर्लांग अंतरावर रहात होती. तिचा विनू फार लाडका होता म्हणून विनोबा वरचेवर आईला सांगून मावशीकडे चालत चालत जात व तासा दोन तासांनी परत येत. परत निघताना मावशी नेहमीच त्याला काहीतरी खाऊ नाहीतर खेळणे असे द्यायची व विनू ते घरी नेऊन आईला दाखवायचा आणि तिच्या सांगण्यानुसार त्याचा वापर करायचा. एक दिवशी तो मावशीच्या घरून परतला तेव्हा आईने पाहिले तर विनूचे तोंड व हात तुपकट आणि मातकट झालेले दिसले. विचारल्यावर विनोबांनी 'मावशीने आज मोठ्ठा लोण्याचा गोळा दिला होत व मी मग तो हातांत संभाळून आणला. दोनदा तो हातांतून खाली पडला मग मी तो उचलला आणि थोडा थोडा करीत खाऊन टाकला' असे सांगितले. आईने मग ''अरे असे मावशीने काही दिले तर तिच्याकडून निघतांना एखाद्या मोठ्या पानांत ठेवून आणि पान टोपींत ठेऊन नीट आणावं'' असे सांगितले. पुढच्यावेळी मावशीने विनूला एक छोटेसे कुत्र्याचे पिल्लू दिले. आईच्या सूचनेनुसार विनायकरावांनी त्याला एका मोठ्या पानांत गुंडाळले आणि ती गुंडाळी टोपीत ठेऊन ती दोन्ही हातांनी घट्ट धरून घराकडे कूच केले. घरी आईला दाखवण्यासाठी पार्सल उघडले तों ते पिल्लू मेलेलेच आढळले. आईने पुन्हा विनूला ज्ञान पाजले,'असे काही दिले तर त्याच्या गळ्यांत एखादी दोरी बांधून त्याला आपल्यामागे ओढत आणावे'. पुढील प्रसंगी मावशीने त्याला (खायला म्हणून) एक जिलबी दिली. विनायकरावांनी आईच्या ज्ञानाच्या डोसानुसार तिला दोरीला बांधून आपल्या मागे ओढत घरी आणले. तिची अवस्था पाहून त्याच्या

आईने हे असेच चालत राहिले तर आईने दिलेले ज्ञान कोणत्याही संस्थेच्या ज्ञानबाडांत कशा तऱ्हेने येऊ शकेल? का येणारच नाही? का हे ज्ञानच नाही? प्रश्नच आहे नाही का?

एखादी लढाई संपली की संरक्षण खात्याची एक परंपरा आहे की त्या लढाईत शत्रूच्या कृतीला आपण काय प्रतिसाद दिला व त्याचा परिणाम काय झाला (आपल्याला हवा होता तसा झाला नसल्यास) त्याला शत्रूने कसा प्रतिसाद दिला वगैरे बाबींवर ज्येष्ठ व जाणते अधिकारी चर्चा व विचारविनिमय करून या लढाईतून आपण काय धडे शिकलो हे ठरवून त्याचा सारांश सर्व अधिकाऱ्यांना माहित करून दिला जातो. याचा हेतू असा की पुढील लढाईचे वेळी कोणता प्रतिसाद योग्य ठरू शकेल याची जाणीव करून घेण्यास अधिकारी समर्थ होऊ शकतील. मग त्या कृती आणि शिकलेले धडे संरक्षण खात्याच्या ज्ञानबाडांत येतील काय? का? असल्या ज्ञानाचा परिणाम म्हणजे सैन्य नेहमी मागच्या लढाईचीच तयारी करते असाही आरोप केला जातो. मग संरक्षण खात्याचा मध्यवर्ती सरकार स्थापन करीत असलेल्या या नव्या ज्ञान आयोगाच्या (Knowledge Commission) कार्यक्रमात काय सहभाग असणार? इतर खातीं तरी आपापल्या ज्ञानबाडांत काय काय नोंदी करू शकतील?

एका कारखान्यांत त्यांचे एक मशीन सकाळी सुरूच होईना. ते फारच महत्वाचे आणि उत्पादनावर चांगलाच परिणाम करणारे होते. संचालकांनी आपल्या मशीन देखभाल विभागप्रमुखांना अगदी धारेवर धरले, तथापि त्या यंत्रातील खोट काही कोणाला समजेना आणि यंत्र काही सुरू होईना. अखेर मुख्य अभियंत्याने जवळच्या शहरांतील नावाजलेल्या मशिनरी देखभाल सल्लागाराला पाचारण केले. त्याने आपल्या जवळील उपकरणें आणि हत्यारांचे द्वारा १०-१५ मिनिटें त्या यंत्राशी खुड्बुड केली आणि कंपनीच्या देखभाल विभागाकडूनच एक हातोडा मागून घेतला आणि त्या मशीनवर एका ठिकाणी त्या हातोड्याने एक हलकासा ठोका मारला आणि अभियंत्यांना ते मशीन सुरूकरण्यास सुचवले. आणि काय आश्चर्य! ते यंत्र एकदम व्यवस्थित सुरूझाले. उत्पादन नियमित सुरू झालेले पाहून सर्वांनी निश्वास सोडला. संचालकांनी मुख्य अभियंत्याबरोबरच या सल्लागाराला आपल्या केबिनमध्ये बोलावले. 'किती बिल झाले?' संचालकांनी विचारले. ताबडतोब तेथेच ते बिल बनवून सल्लागारांनी, 'पांचशे रुपये सर.' म्हणून उत्तर दिले. 'अहो केवळ पंधरा मिनिटांत काम झाले. त्यामुळे हे बिल जास्त आहे असे नाही तुम्हाला वाटत? तुम्ही आमच्याच हातोड्याने जो ठोका यंत्राला दिलात तो आमच्या मेकॅनिकने केवळ पन्नास पैशांत मारला असता की!' म्हणत संचालकांनी आपल्या मुख्य अभियंत्याकडे पहातच बिलांत खोड काढली. अभियंता त्या म्हणण्याला होकार देणार त्या पूर्वीच सल्लागारांनी, 'साहेब तो ठोका मारण्यासाठीचे माझे बिलही केवळ पन्नास पैसेच आहे. उरलेले चारशे नव्याण्णव

रुपये पन्नास पैसे तो ठोका कोठे आणि किती जोरांत मारायचा या ज्ञानाचा चार्ज आहे' उत्तर देऊन टाकले. आणखी वाद न घालता संचालकांनी पूर्ण बिलाची रक्कम देऊन सल्लागाराला ताबडतोब वाटेला लावले ही बाब न सांगताच कळण्यासारखी आहे. आता हा कारखाना ज्ञानबाड बनवण्याच्या प्रयत्नांत सहभागी असल्यास या यशस्वी ज्ञानाची काय नोंद करणार? आणि पुन्हा आवश्यकता भासल्यास त्याचा उपयोग कसा करणार? तो उपयोग न जमल्यास ती नोंद ज्ञान कशी ठरेल? मग बाडातून ती नोंद काढून टाकावी काय? का ती नोंद बाडांत करूच नये? असे अनेक प्रश्न या बाबतीत निर्माण होऊ शकतील.

**ज्ञान व्यवस्थापन आणि प्रत्यक्ष परिस्थिती**

प्रशिक्षण आणि विकासवादी भारतीय समाजाच्या (Indian Society for Training & Development i.e ISTD) त्रैमासिक जर्नलच्या ऑक्टोबर डिसेंबर २००१ या ज्ञान व्यवस्थापन (Knowledge Management) या विषयावरील खास अंकात सार्वजनिक उद्योगांतील (हे फायदेशीर उद्योग 'नवरत्न' म्हणून प्रसिद्ध आहेत) या विषयांत काय मजल मारली आहे याबाबतीतील सर्वेक्षणाचे निष्कर्ष दिले आहेत. त्यानुसार ज्ञान याविषयीं जरी या उद्योगांचे विचार पाश्चात्य विचारसरणीशी जुळत असले तरी त्यांना ज्ञानबाड ही संकल्पना पटलेली दिसत नाही. एखादी अडचण आली की वेगवेगळ्या विषयांतील जाणत्या मंडळींचे एक वर्कशॉप भरते आणि त्यातून निघणाऱ्या निष्कर्षांचा ज्ञान म्हणून ती अडचण निवारण्यासाठी वापर केला जातो. प्रत्येक यशस्वी संकल्पना वा माहितीचे वेगळे (पुढे लागेल तेव्हा वापरावे या उद्देशाने) संकलन करून ठेवत नाहीत.

या विषयातील जाणते जेरेमी वॅगस्टाफ (Mr Jeremy Wagstaff) यांच्या मताप्रमाणे आशियातील उद्योग या व्यवस्थापनाबाबत पुरेसे यशस्वी नाहीत कारण तेथील नोकरदारांत आपले ज्ञान स्वतंत्र ठेवावे अशी फार पुरातन काळापासून भावना आहे व त्यांतून बाहेर येणे त्यांना सोपे जात नाही. 'कसे करावे पासून ते ज्ञानापर्यंत' (From Know-How To Knowledge) चे सुप्रसिद्ध लेखक आणि औद्योगिक सल्लागार ब्रायन ग्लॅडस्टोन यांच्या मतानुसार, पन्नास वर्षापूर्वी कंपन्या माहितीसाठीच्या गृहीत मुद्द्यांसाठी (Data) झगडत आणि (ते नेहमी जुने आणि अर्धवटच असत), त्यापासूनच मोठ्या संगणकांकरवी डेटा मॅनेजर अगर डेटा शास्त्रज्ञ आपल्याला जरुरी असलेली माहिती मिळवत. 'पुढे आपण हे मुद्दे मिळवण्यांत प्राविण्य मिळवले आणि त्यापासून आपणास लागणारी माहिती काढून घेण्यांतही सुधारलो. अतोनात मुद्द्यांऐवजी माहितीच्या अमापपणा (Bottleneck) अनुभवू लागलो. आणि तेव्हापासून अभ्यासासाठी मुद्दे व्यवस्थापनाऐवजी (Data Management) माहिती व्यवस्थापनाकडे (Information Management) प्रामुख्याने लक्ष देऊ लागलो. ग्लॅडस्टोन यांच्या म्हणण्यानुसार 'नव्वदीच्या दशकाच्या मध्यास जागतिक उद्योगांनी

माहितीची सार्वत्रिक अतिवृष्टी (Universal bottleneck) अनुभवली. आत्ता मुख्य अडचण ती माहिती आपण कशी आणि कशाकशासाठी वापरतो ही आहे आणि हाच ज्ञान व्यवस्थापनेचा खरोखर आत्मा आहे'. दुसरी अडचण खास करून आशियांतील उद्योगांना आहे ती म्हणजे कोणीही आपल्याला ठाऊक असलेली (आपल्याला नेमून दिलेल्या कामाव्यतिरिक्तची) माहिती अधिकाऱ्यांना सांगायला सहज तयार होत नाही. त्याबद्दल आपल्याला जाब विचारला जाईल अशी त्याला धास्ती असावी. आणि कामाबाहेरील (त्या माणसाच्या व्यक्तिगत हितसंबंधामुळे (Personal interest) त्याने जमवलेली) माहितीच बहुतांशी कंपनीच्या ज्ञान व्यवस्थापनाला हवी असते. यावरून एका जुन्या दंतकथेची आठवण करून दिल्याशिवाय राहवत नाही.

एका मोठ्या दर्यावर्दी व्यापाऱ्याच्या सुरत शहरांतील घराबाहेर एक पहारेकरी नेमला होता रात्री पहारा करून त्याने स्थावर मालमत्तेला धोक्यापासून वाचवावे अशी त्याच्या नोकरीची नियमावली होती. एकदा तो व्यापारी खूप माल घेऊन परदेशासाठी उद्याच्या बोटीने निघणार होता. घरातील सर्व व्यवहाराची व्यवस्था करीत असतांना तो पहारेकरी घाईघाईने मालकांपुढे आला व 'मला काहीतरी फार महत्वाचे बोलायचे आहे', असे म्हणाला. 'बोल' म्हणून मालकांनी आज्ञा दिल्यावर त्याने, 'साहेब आज अगदी पहाटेच मला स्वप्न पडले की आपली बोट भर समुद्रांत वादळाशी झूंज देतांना बुडाली. पहाटेची स्वप्ने बऱ्याच वेळा खरी होतात म्हणून साहेबानी या बोटीवरून आत्ता प्रवासाला जाऊ नये' असे सांगितले. 'बरं पाहू' म्हणून त्याला रजा देऊन मालकांनी आपले काम सुरूच ठेवले. रात्री झोपल्यावर त्या व्यापाऱ्याला अचानक ताप चढला आणि वैद्यांच्या सल्ल्यावरून त्याला आपला दुसऱ्या दिवसाचा प्रवास रद्द करावा लागला. माल मात्र ठरल्यानुसार बोटीतून रवाना झाला. दहा दिवसांनी एका आलेल्या बोटीवरून समजले की त्या व्यापाऱ्याची माल भरलेली बोट चार दिवसापूर्वी भर समुद्रांत बुडाली व त्यावरचे कोणीही वाचले नाही. आपले प्राण वाचवल्याबद्दल त्या व्यापाऱ्याने देवाचे आभार मानले. तसेच त्या पहारेकऱ्याला बोलावून त्याला चांगले बक्षीसही दिले. पण दुसऱ्या दिवसापासून नोकरीवर येऊ नको अशी सूचनाही केली. त्या पहारकऱ्याने कारण विचारल्यावर, 'पहाऱ्यावर असतांना झोपायचे नसते तरीही आपण पहाटें स्वप्ने पडेपर्यंत झोपलात आणि हलगर्जी केलीत, असा हलगर्जी करणारा कामगार नको' हे उत्तर त्याला गप्प बसवायला पुरेसे ठरले.

आता आवश्यक असलेली माहिती एकाच माणसाजवळ असेल असेही नाही; त्यामुळे अनेकांकडून जमवलेली माहिती योग्यायोग्यतेचा विचार करून एकत्र करून हवा असलेला (अडचणींवर) उपचार तयार करावा लागतो. यासाठी त्यांचे टांचणही ठेवणे आवश्यक पडते. मग ते कसे काय साध्य

होऊ शकेल?

१९९० या दशकाच्या अखेरपर्यंत क्यू. पी. कॉर्पोरेशन जपान या अन्नप्रक्रिया करणाऱ्या मोठ्या कंपनीतील कामगारांमधील परस्पर संबंधातील वातावरण निश्चीतच आदर्श नव्हते. फारच थोडी मंडळी इतरांशी संबंध अगर बोलणेचालणे करण्याच्या खटाटोपांत पडत होतीं. बहुतेकांना आपल्या (एकत्र काम करणाऱ्या) सहकाऱ्यांव्यतिरिक्त इतर कोणाशीही ओळखही नव्हती. आमाने नाकाशिमा (Amane Nakashima) त्यावेळी कंपनीच्या माहितीसंपर्क खात्याचे प्रमुख होते. त्यांना ही बाब खटकत होती. त्याचसुमारास आपल्या संपर्कातील माहितीतंत्र पुरवठा कंपन्याकडून (Software companies) त्यानी ज्ञान व्यवस्थापनाबाबत ऐकले होते. आपल्या या ८५ वर्षे जुन्या कंपनीत चैतन्य आणण्यासाठी याचा काही उपयोग करता येईल काय याचा विचार सुरूकेला. यामुळे आपल्या कंपनीतील सारे वातावरणच चैतन्यमय करावे असा त्यांचा विचार होता. त्यांनी त्यासाठी आंतरिक वापरासाठी एक वेब-साइट सुरू करून साऱ्या कर्मचाऱ्यांना विक्रीतंत्र, व्यवसाय संकल्पना, अगदी आपले छंदसुद्धा याविषयीं संकल्पना आणि माहितीचे इतर कामगारांशी दळणवळण साधण्यासाठी तिचा मुक्त उपयोग करण्याचे आवाहन केले. या देवेघेवीच्या फलस्वरूप कामगारांना आपल्या कामांत प्रोत्साहन आणि अखेर क्यू पी कंपनीच्या उत्पादकतेत खूप वाढ हा फायदा अपेक्षित होता. नाकाशिमा २००० मध्ये विधी विभागाचे (Legal Department) संचालक झाले आणि त्यांनी ज्ञान व्यवस्थापन हा पाच सभासदांचा गट स्थापन केला आणि फारच कमी वापरांत असलेल्या आंतरिक वेब-साइटची पुनर्बांधणी केली. त्यावरील माहिती रोजच्यारोज अद्ययावत करण्यास सुरुवात केली आणि कंपनीच्या एकूण कामगारांच्या ६० टक्के वापरतात याची दखल घेतली. शिवाय हा ज्ञान व्यवस्थापन गटही वरचेवर नवीन मिळालेल्या माहितीचे संक्षिप्त रुपांतील वार्तापत्रही त्या वाहिनीवर सर्वांना ई-मेल स्वरुपांत पाठवू लागला. कामगारांना ती वाहिनी आपली वाटू लागली, कामगारांचे आपापसातील दळणवळण (Communication) चांगलेच वाढलेले आहे व वाहिनीचा उपयोग आपापल्या छंदाच्या देवेघेवीप्रमाणेच कंपनीच्या कामासाठीही होऊ लागला.त्याच्या वाढत्या नियमित उपयोगामुळे कंपनीचे २००३ मध्ये विक्रीचे उत्पन्न वाढून ४७३०० कोटी येन (400 Crores $ US) झाले! नाकाशिमा या वाढीचे श्रेय ज्ञान व्यवस्थापनाला देतात.

श्री. क्रिस प्रिस्टे (Cris Prystay) सिंगापूरमधील प्रसिद्ध व्यवस्थापन सल्लागार सांगतात की सिंगापूरमधील पोलीस ऑफिसर रोज सायंकाळी संपूर्ण देशभरांतील पोलीसांनी अंमलांत आणलेल्या वेगवेगळ्या (संशयितांशी वागतांना, सामान्य जनांकडून माहिती मिळवताना अगर गुन्ह्यांचा तपास करतांना) ज्या परिणामकारक तऱ्हा अगर पद्धती वापरल्या असतील त्या ई-मेल करवीं मुख्यालयाकडे वर्णन करून पाठवतात त्याचे

अवलोकन करतात, त्याचा अभ्यास करतात. आपल्या कामांत त्यापैकी जी उपयोगी पडण्याचा संभव वाटेल, ती त्यांनी वापरावी असे तेथील पोलीस खात्याचे ज्ञान व्यवस्थापनाबाबतचे धोरणच ठरले आहे. आत्तापर्यंत या विषयीचा त्यांचा खर्च ९० टक्के उपकरणे व साहित्य (Hardware & Software) यावर व उरलेली १० टक्के रक्कम व्यक्तींना प्रोत्साहनाबाबत होतो, त्याचे प्रमाण सल्लागारांनी आता उलट करण्यास सांगितले आहे व त्यामुळे माणसांना जास्त महत्व दिले पाहिजे असे त्यांचे मत दिसते. त्यामुळे आता आवश्यक पडल्यास यशस्वी पद्धती अंमलांत आणणारे अधिकारी स्वतः इतर पोलीस अधिकाऱ्यांसमोर त्या पद्धतीचे प्रत्यक्ष वर्णनही करू लागले आहेत. याचा ई-मेल संदेशवाहनापेक्षांही जास्त फयदा होत असल्याचा पोलीसखात्याचा दावा आहे. जेव्हा लागेल तेव्हा हे ज्ञान वापरायचे असलेमुळे त्याचेही एक बाड करावे लागणारच. केव्हा काय व कोणत्या बदलाचेबरोबर वापरायचे हे वेळप्रसंगावर अवलंबून असल्यामुळे हे बाड ज्ञानबाड होईल काय? ते लिखाण वाचून जसे समजेल तसेच वापरणारा वापरणार, मग ते अगदी नोंद केल्यानुसारच वापरले जाईल याची काय खात्री? आणि या नवीन प्रकार जर यशस्वी ठरला तर लिखाण ज्ञान म्हणून राखले जाईल काय, का हे दोन्हीही प्रकार ज्ञान म्हणून नोंदले जातील? आता असे नोंद केलेले ज्ञान केव्हा वापरायला मिळणार हे तर काही आगावू ठरवता येणार नाही, मग अशी ज्ञानबाडे किती तयार होतील? आणि आवश्यकता भासेल तेव्हा सगळीच धुंडाळावी लागणार का? आणि जर दोन-तीन नोंदी एकत्र करून वापराव्या लागणार असल्या तर किती समय लागेल याचा काही अदमास करणे शक्य होईल का?

सध्या ज्ञान संचालक म्हणून अर्न्स्ट ॲण्ड यंग (Ernst & Young) या अकौंटिंग करणाऱ्या कंपनीत असलेले जौफ ट्रॉटर (Geoff Trotter) यापूर्वी गिनेस वर्ल्ड रेकौर्ड मध्ये व्यवस्थापक म्हणून काम पहात होते. आपल्या नोकरदारांच्या डोक्यांत असणाऱ्या माहितीवरच त्याचा ज्ञानसागर अवलंबून असल्यामुळे त्यांना दादापुता करून नोकरदारांना सदा पटवून द्यावे लागते की त्यांच्या जवळील माहिती कंपनीबरोबर वाटून घेतल्याने त्याचे काहीच नुकसान होणार नाही की त्यांच्या नोकरीवर गदाही येण्याचा संभव नाही. सध्याच्या सार्वत्रिक सक्तीच्या मुदतपूर्व निवृत्तीच्या काळांत तर ही गोष्ट खूपच अवघड आहे. ज्ञान व्यवस्थापनातील ज्ञानाची नोंद हे एक अत्यावश्यक कर्तव्य असल्यामुळे नोकरदारांच्या माहितीचे खात्याच्या डाटाबेसमध्ये रुपांतरासाठी वेळखर्च करण्यासाठी आपल्या सहकाऱ्यांना तयार करणेही अत्यंत कठीण काम होते. ते नेहमी म्हणतात की 'आमच्या १८-सभासदांच्या गटातील लोकांची कातडी अगदी ५० सेंटीमीटर जाड असल्यामुळे इतराचे शिव्याशाप सहज सहन करू शकते' त्याच्या कामाचे स्वरूप इतर लोकांचा विचार करता

कृतघ्नपणाचेच आहे.

त्यांचा अर्धा गट संशोधन करीत असतो आणि कोणी मागितल्यास स्थानिक बाजारावर अहवाल तयार करून 'जागतिक संशोधन आणि पृथक्करणासाठीची पायाभूत माहिती (Global Research and Analysis Database or GRAD for short)' मध्यवर्ती माहितीपटलावर ठेवण्याचे काम करीत असतो बाकी अर्धा गट (त्यांना ट्रॉटरसाहेब भीड पाडणारे म्हणतात.) वेगवेगळ्या उद्योगएककांच्या प्रमुखांना भेटून आपल्याजवळ असलेल्या वेगवेगळ्या पायाभूत माहितीचा-ज्ञानाचा उपयोग करण्याच्या भरीस पाडण्याच्या प्रयत्नांत गढलेला असतो. या ज्ञानपटलावर उगाच माहितीचा डोंगर सांचू नये म्हणून तिचा वरचेवर पुनरावलोकन केले जाते आणि दोन वर्षे न वापरलेली माहिती पटलावरून हटवली जाते. कोणाला त्या पटलावरील माहितीची आवश्यकता आहे असे दिसले तर ज्या नोकरदाराकडून ती माहिती जमा केलेली असते त्यालाच पुढे केले जाते. पटलावरील वा नोंदलेल्या महितीला (माहिती तंत्रज्ञानाला) जेमतेम ५ टक्के महत्व दिले जाते. या ज्ञानसाधनेत मुख्य महत्व माणसालाच असले पाहिजे.

**निष्कर्ष**

वरील प्रत्यक्ष अनुभवांवरून पुढील काही निष्कर्ष निघू शकतातः-

(१) ज्ञान माणसांकडेच असते,

(२) आपल्या कामाव्यतिरिक्तचे ज्ञान अथवा माहिती (जवळ असले तरी) माणूस सहजतेने देत नाही,

(३) ज्या विभागातील अडचण असेल त्याच विभागातील माहिती अगर ज्ञान ती दूर करण्यास उपयोगी पडेल असे नाही,

(४) एका विभागातील अडचण दूर करण्यास अनेक विभागातील माहितींचे अगर ज्ञानाचे एकत्रीत संकलनीकरण आवश्यक असू शकेल,

(५) वेगवेगळ्या माणसांकडून मिळालेले अनुभवी ज्ञान नोंदीत ठेवावे लागते आणि आवश्यकतेनुसार वापरता येते,

(६) नोंद केलेली माहिती वा अनुभवसिद्ध ज्ञान केव्हा वापरता येईल हे काही आगावू सांगता येत नाही,

(७) बराच काळ नुसतीच नोंद केलेले ज्ञान न वापरले गेल्यास ती नोंद वाया जाते,

(८) नोंद केलेली माहिती वाचण्यापेक्षा अनुभवी माणसाने प्रत्यक्ष सांगणे जास्त उपयुक्त ठरते.

९) कोणकोणते ज्ञान (अनेक स्रोतांनी दिलेले) कसे मिसळायचे हे कोणी सांगू शकेलच असे नाही,

(१०) एखादी नवी (पूर्वी न आलेली) अडचण पुढे आली तर या ज्ञानबाडाचा उपयोग करावा असे कोणालाही वाटणार नाही. मग ते ज्ञान कसे मिळवणार?

जेव्हा अनेक लोकांच्या सहकार्याने एखाद्या अडचणीच्या निवारणासाठीचे ज्ञान जमवायचे असेल तेव्हा ही ज्ञान

व्यवस्थापनाची नवी पद्धती फारच वेळकाढू ठरण्याचा संभव आहे. या ज्ञान संकलित करून नंतर अडचण येईल तेव्हा त्या संकलित ज्ञानबाडातून प्रत्युत्तर शोधत बसण्यापेक्षा सध्या प्रचलित असलेले ब्रेन स्टॉर्मिंग हे तंत्र वेळ वाचवणारे आणि जास्त परिणामकारक ठरूशकेल या पाश्चात्यांच्या ज्ञान व्यवस्थापन तंत्रामुळे काही लाभ होईल असे दिसत नाही. अनेक लोकांनी सुचवलेले अनुभवाचे बोल चालू परिस्थितींत एकत्र करून वापरणेही 'वापरून पहा अयशस्वी ठरले तर बदल करा' याच तंत्रांत बसणार त्यामुळे वेळ आणि खर्च दोन्हीदृष्टीने नुकसान होणार. ज्ञानाची नोंदणी करून जरुरी असेल तेव्हा यशस्वीपणे वापरावे यांत फारच थोड्या अडचणींचा समावेश होऊ शकेल, त्या फक्त एकाच विभागातील व केवळ तांत्रिक प्रकाराच्या अडचणी असतील. आणि सहसा दोन अगदी सारख्या अडचणी क्वचीतच येतात, त्यामुळे ज्ञानबाड ठेवणे म्हणजे एक खर्चिक व फारच विरळा उपयोगांत येणारे संकलन ठरण्याचा संभव आहे. थोडक्यांत पाश्चात्य विचारसरणीनुसारही या पद्धतीत ज्ञानही नाही आणि काही व्यवस्थापनही दिसत नाही.

क्रमशः

**मेजर मु. दि. आपटे**
३२, रक्षक सोसायटी,
औंध कँप पोस्ट ऑफिस,
पुणे - ४११०२७

•••

(पृष्ठ क्र.७ वरून... **गीतकृष्णायन**)

बलराम दादाही तिथेच प्राणांचा निरोध करून बसलाय.

धसकून वसुदेवानं विचारलं, पण हे सारं कशासाठी?

कृष्णानं मृदू पण अलिप्त स्वरात उत्तर दिलं, महामृत्यूला गळामिठी घालायला! ज्या कार्यासाठी या उपाधीचा आश्रय घेतला होता ते पूर्ण झालंय. आता या शरिराचा मोह व्यर्थ आहे. मी गेल्यावर आपण अर्जुनास बोलवून या देहावर अंतीम संस्कार करावेत. मग लागलीच सर्वांनी द्वारकेचा त्याग करावा कारण माझ्या निर्याणानंतर महासागर या नगरीचा ग्रास करणार आहे.

एवढं बोलून तो विरक्त शिरोमणी योगेश्वर श्रीकृष्ण मागे वळून न बघता प्रभासक्षेत्राजवळील वनाकडे स्थिर पावलं टाकू लागला...

**प्रसाद दि. औटी**
न्यू अजंठा अव्हेन्यू, बि. नं.३ बी.-१,
६ वा मजला, ब्लॉक नं. १८,
पौड रोड, कोथरूड, पुणे - ४३३०३८
दूरध्वनी : ०२०-२५४५००८९
मोबाइल : ९८८११०४०७४

•••

(मुख पृष्ठावरून) **संपादकीय**

'आषाढी, कार्तिकी, माघी अथवाचैत्री यांपैकी एका शुद्ध एकादशीस गळ्यात तुळशीची माळ घालून नियमाने जो पंढरपूरास जातो तो पंढरपूरचा वारकरी म्हटला जातो व त्याच्या उपासनेचा मार्ग तो 'वारकरी पंथ' होय.

महाराष्ट्रातील या भक्तिसंप्रदायाचे मंदिर कसे उभारले गेले. यावर एक अभंग संत जनाबाईंनी लिहिलाः

**संतकृपा झाली। इमारत फळा आली।**
**ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया।**
**नामा तयाचा किंकर। तेणे केला हा विस्तार**
**जनार्दन एकनाथ। खांब दिला भागवत**
**तुका झालासे कळस। भजन करा सावकाश।।**

ज्ञानदेवांच्या आधीपासून वारकरी संप्रदाय अस्तित्वात होता. मात्र या पंथाला तात्विक व अध्यात्मिक अधिष्ठान ज्ञानेश्वर महाराजांनी दिले. 'रामकृष्णहरी' हा संप्रदायाचा मंत्र आहे. पंढरीची व आळंदीची अशा दोन वाऱ्या वारकरी संप्रदायात चालतात. पंढरीची वारी सर्वात महत्त्वाची. ती आषाढ शुद्ध एकादशी ही होय. आळंदीच्या वारीचा दिवस कार्तिक वद्य एकादशी हा आहे. आषाढीच्या वारीस ज्ञानेश्वर महाराजांची पालखी आळंदीहून पंढरीस येते. आषाढी-कार्तिकी या वाऱ्यांना प्रत्येक फडावर दशमी ते पौर्णिमा भजने व किर्तने होतात. रात्री हरिजागर असतो. पौर्णिमेस सर्व दिंड्या पंढरपूरापासून जवळच असलेल्या गोपाळपुरी जातात. तिथे काला होतो. काल्याच्या लाह्या एकमेकांच्या मुखी घालून वारकरी आपल्या वारीची सांगता करतात. यावेळी स्पृश्यअस्पृश्य भेद मानला जात नाही. आळंदीच्या वारीस पंढरीहून नामदेव पुंडलीक इ. संतांच्या पालख्या व दिंड्या येतात. भजन, किर्तन, हरिजागर हे सोहळे होतात. कार्तिक वद्य त्रयोदशी हा ज्ञानेश्वरांचा समाधिदिन होय. या दिवशी समाधीचे अभंग म्हटले जातात व काला होतो. देहू, पैठण, त्र्यंबकेश्वर, सासवड इ. संतसंगी त्या त्या संतांच्या पुण्यतिथीला नियमाने जाणारेही वारकरी असतात.

ज्ञानेश्वरांनी वारी मागील भक्तीयोग मोठ्या गोड शब्दात सांगितला.

**जे जे भेटीजे भूत। ते ते मानीजे भगवंत।।**
**हा भक्तीयोग निश्चित। जाण माझा।।**

भक्तीची याहून सुटसुटीत व्याख्या आजवर कोणी केली नसावी. जी व्यक्ती भेटेल, जे 'भूत' अर्थात प्राणी, पक्षी, लता, वेली, जड, चेतन वस्तू त्यात परमेश्वर विराजमान आहे हे मनात ठसवणे म्हणजे भक्ती. 'योगयागादी कर्मकांडाविरुद्ध ज्ञानेश्वरांनी बंड केलं आहे. 'म्हणोनि भक्ती गा एकसरे। जाती अप्रमाण।।' अशी हाक त्यांनी दिली. परमेश्वर प्राप्तीचा हक्क अखिल मानव जातीला असून भक्तीप्रेमावीण ज्ञान म्हणजे अभिमानाचे नवे द्वार आहे असा संतांचा विचार आहे.

'संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती' या अद्वितीय ग्रंथात ज्येष्ठ अभ्यासक गं. बा. सरदार लिहितात –

''ज्ञानेश्वरांची समन्वयदृष्टी ही त्यांच्या

जीवितकार्याशी सुसंगत आहे. दलितोद्धार हे त्यांच्या कार्याचे एक प्रमुख अंग होते. महाराष्ट्रातील शुद्रातिशुद्रांच्या धर्मश्रद्धेला तत्त्वजिज्ञासेची जोड द्यावी, त्यांची धर्मसाधना डोळस व अंतर्मुख बनवावी म्हणून ज्ञानेश्वरांनी मराठीतून ग्रंथरचना केली. भावार्थदीपिकेत त्यांनी 'मी अत्यंत जडू असे। परि ऐसा ही नीके परिहसे।' अशा वृत्तीचा श्रोता आपल्या डोळ्यांपुढे ठेवला आहे. त्यामुळे साहजिकच अशाच तऱ्हेच्या विवेचन पद्धतीचा त्यांनी अंगीकार केला. त्यांच्या निरुपणात खंडणमंडणाचा अभिनिवेश नाही, वाद जिंकण्याची जिद्द नाही, तर सर्वसामान्य लोकांचे धर्म जीवन उच्च पातळीवर नेण्याची तळमळ आहे. सामान्यजनांविषयी त्यांच्या अंतःकरणात उत्कट सहानुभूती आहे. म्हणूनच ज्ञानी पुरुषांनी दैनंदिन व्यवहारात अलौकिकत्व मिरवू नये, आपली कर्तव्ये पार पाडून इतर लोकांना धडा घालून द्यावा असे त्यांनी आवर्जून सांगितले आहे.''

न्यायमूर्ती रानडे यांनी 'Rise of the Maratha Power' या आपल्या ग्रंथात अत्यंत व्यापक व समतोल बुद्धीने संत चळवळीचे समालोचन केले. शिवकालीन राजकीय आंदोलनाची वैचारिक पार्श्वभूमी संत मंडळींच्या कार्यांतूनच तयार झाली असा त्यांच्या विवेचनाचा सूर आहे.

ज्ञानेश्वर तुकारामादी संतांचे कार्य हे केवळ सांप्रदायिक स्वरूपाचे नसून ती एक व्यापक चळवळ होती. तीच चळवळ आज वारीच्या रुपाने आज पाहतो. संतांचा संप्रदाय केवळ विठ्ठलोपासकाचा एक साधासुधा भक्तिपंथ नव्हता तर शैव, नाथ, दत्त, चैतन्य, सुफी इत्यादी पंथातील उदार, चिंतनशील व संस्कारक्षम भक्तजनांना सामावून घेणारे ते एक सर्व संग्राहक व्यासपीठ होते.

संप्रदाय, भक्ती, वारी सोबतच मराठी भाषेला साहित्य सोनियाच्या खाणी संतांनी दिल्या. ज्ञानोबांनी मराठी मुलुखात ब्रह्मविद्येचा सुकाळ करत विवेकवेलीची लावणी केली. मराठी भाषेला अमृतातेही पैजा जिंकणारी शब्दकळा दिली. वि. का. राजवाडे या इतिहासकाराने मराठ्यांच्या इतिहासाची साधने या ग्रंथाच्या आठव्या खंडाच्या प्रस्तावनेतील विवेचनात असे नमूद केले की 'ज्ञानेश्वर एकनाथ, नामदेव, तुकाराम इत्यादी संताच्या साहित्यामुळे फारसी भाषेच्या वर्चस्वापासून मराठी भाषेचे रक्षण झाले. तसेच हे ग्रंथकार नसते तर 'मराठीची एखादी निराळीच भाषा बनती आणि निराळी भाषा बनल्यावर मराठ्यांचे राष्ट्र असे शब्द वापरता आले नसते. इतकेच नव्हे तर हे ग्रंथकार नसते तर सतराव्या शतकात झालेली स्पृहणीय राज्यक्रांती झालीच नसती' (प्रस्तावना खंड पृ.३९५)

ज्ञानदेव व नामदेव यांचा काळ तेराव्या शतकाचा उत्तरार्ध व चौदाव्या शतकाचा पूर्वार्ध असा होता. त्यानंतर सुमारे १०० वर्षांनी एकनाथांचे पणजे भानुदास हे पैठणात जन्मले. विजयनगरच्या तत्कालीन राजाने पांडुरंगाची मूर्ती आपल्या राजधानीत नेली असता भानुदासांनी आपल्या भक्तीच्या बळावर ती पंढरपूरला परत आणली. पुढे याच कुटुंबात

जन्माला आलेले संत एकनाथ यांनी भागवत धर्माच्या मंदिराला 'एकनाथी भागवत' या ग्रंथाच्या रुपाने खांब दिला. 'जनार्दन एकनाथ। खांब दिला भागवत।।'

संत एकनाथांचे कार्य महाराष्ट्राच्या वैचारिक जडणघडणीत अमूल्य आहे. तत्कालीन निजामशहाच्या अंमलाखालील पैठण हे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत होते. हिंदूंच्या देवळाची मोडतोड करून मशिदी उभ्या करणे, स्वराज्याचा लोप होणे, तीर्थस्थळांचा विध्वंस करणे, यात्रा-उत्सवांवर प्रतिबंध लादणे अशा गोष्टी घडत असताना एकनाथांनी मराठी जनतेला 'भारुड' अभंग, 'गवळण', 'भावार्थ रामायण', 'चिरंजीवपद' इत्यादी माध्यमांनी पुनरुज्जीवीत केले. एकनाथांमुळे महाराष्ट्रातील बहुसंख्य जनता अन्य धर्मात धर्मांतरित झाली नाही.

प्रा. न. र. फाटक म्हणतात -

''महाराष्ट्रातील देवधर्म संप्रदायाच्या रुपाने जी संघटना ज्ञानेश्वरांपासून अस्तित्वात होती, तिचे शुचित्व व कर्त्यापुरुषांच्या अभावी या संघटनेला आलेले दैन्य एकनाथांच्या शिकवणीने नाहीसे झाले. लोकांमध्ये देवधर्माच्या अभिमानाचा उल्हास संचारला आणि यालाच पुढे पन्नास वर्षांनी स्वराज्य स्थापनेच्या प्रयत्नाचे फळ येऊन त्याचा परिपाक महाराष्ट्रातील जनतेस भोगावयास मिळाला.''

नामदेवांनी वारकरी परंपरा पंजाबातील 'घुमान' पर्यंत नेली व 'गुरुग्रंथसाहिब' या शिखांच्या पवित्र ग्रंथांत त्यांचे अभंग समाविष्ट झाले. तर एकनाथांनी मराठी संस्कृत पांडित्यांचे आगर असलेल्या काशी पर्यंत पोचवली.

तुकाराम महाराजांचा काळ वारकरी संप्रदायाचा कळसाध्याय आहे. एका बाजूला छत्रपती शिवाजी महाराज मराठी मुलुखास स्वराज्य देत होते, तर दुसऱ्या बाजूला समर्थ रामदास स्वामी भगवान रामचंद्रांचे आवाहन करून परकीय आक्रमणापासून एतद्देशीयांना बंड करावयास लावत होते.

**'देव मस्तकी धरावा। अवघा हल्लकल्लोळ करावा।।'**

असा संदेश देत होते. ज्यांना स्वधर्म, स्वतःची भाषा व संस्कृतीची कदर नाही तो समाज मोठा होत नाही. 'ज्यांना उजळ माथ्याने देव डोक्यावर मिरवता येत नाहीत ते अशक्त लोक स्वराज्य कसे स्थापणार?' असा रोकडा सवाल करत रामदासांनी देखील महाराष्ट्राच्या संत परंपरेत मोलाचे योगदान दिले.

सनातन वैदिक धर्माची प्रस्थानत्रयी म्हणजे 'गीता', 'उपनिषद' व 'ब्रह्मसूत्र' असून वारकरी संप्रदायात 'ज्ञानेश्वरी', 'तुकाराम गाथा' व 'एकनाथी भागवत' याला प्रस्थानत्रयी मानल्या जाते. या तीन ग्रंथातून प्रसृत झालेल्या विराट मानव्याची संकल्पना व समता व बंधूतेचा संदेश म्हणजे आजचा वारकरी संप्रदाय. तुकाराम महाराजांच्या अभंगाचे गारुड लोकमान्य टिळक, न्यायमूर्ती रानडे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरही होते. आपल्या 'मूकनायक' या मुखपत्रात डॉ. आंबेडकर तुकोबांचा अभंग मुखपृष्ठावर उद्धृत करतात. दिलीप चित्रे या मराठी कवीने इंग्रजीत

'Says Tuka' हे पुस्तक लिहून तुकोबांना आधुनिक कवी म्हणून प्रस्थापित केले आहे.

तुकोबांनंतर संप्रदाय निळोबाराय या महापुरुषाने चालवला. त्यांच्यानंतर ३०० वर्षांत वारकरी परंपरेत शंकरस्वामी शिऊरकर, मल्लप्पा वासकर, हैबतराव बाबा, वासुदेव देहूकर, चातुर्मास्ये महाराज, साखरे महाराज, विष्णुबुवा जोग, दादामहाराज सातारकर, केशवराव देशमुख, बंकटस्वामी, लोहिया महाराज, प्रा. शं. वा. दांडेकर इ. अनेक कर्तबगार मंडळी होऊन गेली.

आज हीच परंपरा वारीच्या रुपाने आपणास पाहण्यास मिळते. सर्व जातीधर्मांतील लोक पांडुरंगाच्या भेटीची आस घेऊन मार्गस्थ होताना 'ज्ञानोबा तुकाराम' या अमृतवाणीचा जयघोष करत 'नाचू किर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी' या उक्तीनुसार विवेकाच्या वाटेवर चालत जातात. हैबतबाबांनी ज्या शिस्तीची वारीमध्ये प्रतिष्ठापना केली त्याच शिस्तीत लाखोंचा समुदाय अत्यंत गुण्यागोविंदाने शेकडो मैल अंतर पार करून पंढरपूरी पोचतो. ऊन, वारा, पाऊस झेलत, सुखी संसाराची वाट सोडून तो मार्गस्थ होतो. तुकोबा म्हणाले –

**'संपदा सोहळा नावडे मनाला।**
**लागला टकळा पंढरीचा।**
**जावे पंढरीशी आवडे मानसी।**
**करी एकादशी आषाढी हे।**
**तुका म्हणे असे आर्त ज्याचे मनी।**
**त्याची चक्रपाणी वाट पाहे।।'**

आजच्या व्यसनाधिनतेच्या व मनःस्वास्थ्य बिघडलेल्या जगात पंढरीची वारी खूप मोठा संदेश देते. अनेक उच्च विद्याविभूषित व चिंतनशील लोकांचा ओढा हल्ली वारीकडे लागला आहे. 'झिंग झिंग झिंगाट' आदी गाण्याच्या ठेक्यावर बेधुंदपणे व्यसनाधीन होऊन नाचणाऱ्या आधुनिक पिढीला 'ज्ञानोबा तुकाराम'ची आर्त साद गुणगुणावी वाटेल तेव्हा नक्कीच सामाजिक बदल जाणवेल. प्रतीकं स्वीकारून विचार हरवून गेलेल्या आजच्या पीढीला 'वारी' हा एक इव्हेंट आहे असं वाटतंय. संतसंगती, भक्ती, सकारात्मक विचार, निर्व्यसनीपणा व समता या अजरामर मूल्यांची उधळण करत विवेकाच्या वाटेवर चालणे म्हणजे वारी.

श्रवण, मनन, निदिध्यासन इत्यादी ज्ञानप्राप्तीच्या पायऱ्यांवरून –

**'हे विश्वची माझे घर। ऐसी मती जयाची स्थिर।**
**किंबहुना चराचर। आपणची जाहला।।'**

हा ज्ञानेश्वर माउलींचा विश्वबंधुत्वाचा संदेश घेऊन 'Citizen of the World' होण्याचा संकल्प करून आनंदवारीत सहभागी होण्यातच सध्याच्या पिढीचे हित सामावले आहे.

•••

**संपादक** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर
**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे - ४०० ६०१
**मुद्रणस्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१